# कुमुद्वती.

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं. ४५५
२५-७-१९२८

REFBK-0003444

दु. आ. तिवारी.

॥ ॐ नमश्चण्डिकायै ॥

काव्यकिरणमाला—किरण पांचवा.

# कुमुद्वती

लेखक,

दु० आ० तिवारी, जळगांव.

संपादक व प्रकाशक,

मि० का० भोरटके, जळगाव.

मुद्रक,

दत्तात्रेय गोविंद सडेकर,

"धनंजय" प्रेस, खानापूर-बेळगाव.

डिसेंबर १९२७.

REFBK-0003444

किम्मत आठ आणे.

[ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.]

# प्रकाशकाचें निवेदन

काव्यकिरणमालेचे एव्हांपर्यंत चार किरण प्रकाशित झाले आहेत. आता हा पांचवा किरण प्रकाशमान होत आहे, याचें नांव ' कुमुद्वती. '

'कुमुद्वती' हें पुस्तक सुप्रसिद्ध महाराष्ट्रशाहीर श्री० कवि तिवारी यांच्या लेखणीतून उतरलेलें असून, त्यांत त्यांच्या विविध स्फूट कवितांचा संग्रह करण्यांत आलेला आहे. निर निराळ्या प्रसंगीं, त्यांच्या भावनांनीं जीं आल्हादजनक रूपें धारण केलीं आहेत, त्यांचें सहज दर्शन एखाद्या रम्य तडागा-तील नयनमनोहर कुमुदाची स्मृती करून देतें; म्हणूनच त्यांनीं आपल्या कविता संग्रहास ' कुमुद्वती ' हें सार्थ नांव दिलें असावें, असेंच कोणाहि सद्रसिकास वाटेल.

ज्या ऐतिहासिक व राष्ट्रीय कवितांविषयीं कवि तिवारी यांचा लौकीक आहे, त्याच प्रकारचीं ९।१० प्रकरणें या संग्रहांत आहेत, व तीं नेहमींप्रमाणें सरसच आहेत. व्यावहा-रिक कवितेंतील स्वत्व व स्वाभिमान उद्बोधक आहे. लोकमान्य, महात्मा अशा थोर पुरुषांचें यशोगायन संतोषदायक आहे; आणि ईश्वरी भक्ती, नीती, सदाचार यांचे गुच्छ, यांत दर-वळत आहेत. कुमुद्वतीच्या वाचकास, आमच्या या लिहिण्याचा संप्रत्यय येईल.

या संग्रहासही आमचे स्नेही, श्रीयुत प्रेमचंद इच्छाराम पाटील, यांनीं आश्रय दिलेला आहे; ही गोष्ट सर्वस्वी त्यांना भूषणावहच आहे.

या किरणानें, मालेंतील वाङ्मयाच्या विविधतेंत भरच घातली आहे. असा किरण प्रकाशनास दिल्याबद्दल, आम्हीं ग्रंथकर्त्याचे आभारी आहों.

जळगांव<br>
चंपाषष्ठी<br>
ता० ३०।११।२७

मि. का. भोरटके.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | संशोधन | १ |
| २ | अज्ञातसौंदर्य | ४ |
| ३ | देवानन्तर—वद्य कोण ! | ६ |
| ४ | दोन प्रश्न | ९ |
| ५ | हे कोण ? | १० |
| ६ | आणि हे कोण ? | ११ |
| ७ | महाराष्ट्रीय | १२ |
| ८ | तरवारीचे वार | १४ |
| ९ | विजयि मराठा | १६ |
| १० | पुरन्दरचे गडकरी | १८ |
| ११ | निर्वाणीची वाणी | १९ |
| १२ | कट्यार | २१ |
| १३ | अर्ध्या वाटेंतून | २३ |
| १४ | रणभूमी | २५ |
| १५ | देवगिरी | २८ |
| १६ | सावध रहा ! | ३५ |
| १७ | केवळ मानासाठीं ! | ३७ |
| १८ | तो काळ असता तर— | ३८ |
| १९ | जागृति | ४० |
| २० | देशभक्त | ४२ |
| २१ | लोकमान्यांचें तेज | ४५ |
| २२ | लोकमान्य गेले ! | ४६ |
| २३ | लोकमान्याचें यशोगायन | ५३ |
| २४ | लोकमान्याचा स्वर्गौरव | ५८ |
| २५ | महात्मा | ६१ |

२६ महात्मा मोहन ... ... ६३
२७ लोकमित्र ... ... ६५
२८ मित्र असा पाहिजे ... ... ६७
२९ शिलावाचून ... ... ६९
३० निग्रही नव्हे दुराग्रही ... . ७१
३१ त्याच्यापेक्षा हें बरें ! ... ७३
३२ गाऊ नये त्यापुढें .. ... ७६
३३ श्रीमन्त .. ७७
३४ तेव्हा— .. ७९
३५ तू व मी . ... ८१
३६ कृतघ्न कोण ? . ... ८२
३७ पहिली सलामी ८४
३८ शृगालान्योक्ति ... ... ८६
३९ कस्तूरी-मृग . ... ८८
४० लोकोत्तर सद्गुणी .. .. ९१
४१ कविपरीक्षा ... .. ९२
४२ कवीची इच्छा ... ९३
४३ कविपश्चात् . ९५
४४ मृतदेहास .. ९७
४५ अभ्राच्छादित चन्द्र . . १०४
४६ सागर ... ... १०८
४७ एक पुष्पवृक्ष . .. ११३
४८ सारिका ११४
४९ बालबकुल .. ११५
५० पाहिजे . .. ११६
५१ कधीं ? ... ... ११७

1235



कै० तोताराम इच्छाराम पाटील—सावदें.

# अर्पण-पत्रिका

आमचे स्नेही, कै० तो० इ० पाटील याच्या उदार आत्म्यास हे वाङ्मयपुष्प वाहिलें आहे. त्याचे बंधु व आमचे काव्य-प्रेमी मित्र श्री० प्रेमचंद इच्छाराम पाटील यानीं आम्हास संधी दिली, याविषयीं ग्रंथकर्ता त्यांचा आभारी आहे.

—दु० आ० तिवारी.

# 'कुमुद्वती'

ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ५८४४

## संशोधन

[पृथ्वी-वृत्त]

१

जिथें धवल मीन ते विलसती वरी खालतीं,
तटोपगत होउनी मकर भक्ष्य आलोकिती,
तृषाकुल सरोवरीं वळति नीर प्याया करी,
तिथें बसुन शोधिलें तुज गजार्तहारी हरी !

२

प्रमत्त--नृपमंदिरीं अनय-पापचारी सभा—
करीत असतां तुझ्या भजक--मानभंगास बा !
घडेल तव दर्शन क्षण वळून खांबाकडे—
बघे नरहरी ! तरी सफल हेतु तो ना घडे !

३

तुझ्यास्तव हरी ! वरी विमल दान--धर्मीं सुधी,
कुणास वदलों असा मुखिं न शब्द ' नाहीं ' कधीं.
त्वदागमन--मार्गीं तें बहु विलोभवीलें मना,
दिसे तरि न लोचना बहु सुस्फूर्ति बा वामना !

४

सुरेश्वर असो, तया अपुलि जन्मभूमी प्रिय.
कुठेंहि बसला, तिचा करिल शेवटीं आश्रय.
भवच्चरणभूषिता भटकलों मही सत्वरीं,
विशून्य मथुरा तुझ्याविण दिसे अयोध्यापुरी !

५

समस्त जगीं राहशी, परि विशेष साधु-स्थळीं.
सुतीर्थिं वसणें तयाहुनिहि आवडे भूतळीं.
सुतीर्थ-निकटीं तुला म्हणुन बाहिलें ईश्वरा !
न तूं उघडिले तरी नयन बद्रिनाथेश्वरा !

६

फणीश्वर दिसे, तया पुसतसें-' कुठें श्रीहरी ? '
न शब्द वदतां शिरे अहि वसुंधराभ्यतरीं !
नभीं उडुन दावितो गरुड वास तैसा तुझा,
शिरूं महिं कसा ? उडूं नभिं कसा ? तुझ्यासाठिं बा !

७

सुनिल नभ पाहतां, उतरशी गमे श्यामला !
नभस्तटिनि ही नसे, तरल वैजयंती गळां !
निशापति न हा, तिच्यामधिल कौस्तुभाचा मणी,
तमालतरुशामला ! मुख न तें दिसे लोचनीं !

८

प्रभातसमयीं बघे नयनरम्य पीतांबरा[१],
गमे उदय पावशी मिरवित स्व-पीतांबरा.
दिनेश्वर गमे तुझ्या किरिट-भूषणाचा मणी,
दिसे रुचिर मूर्ति ती परि न चक्रधारी झणी !

९

इथें असति ‘ देवकी ’ सुतवती ‘ यशोदा ’ किती ?
मुखीं वदत ‘ कृष्ण ’ त्या निजसुतासही बाहती
जरी गृहिं गृहीं महीं दिसति कृष्ण संकर्षणा !
कृतीविण न येतसे महति नामधारी जना.



---

१ पिवळट आकाशाला.

# अज्ञातसौंदर्य

[ शा० वि० ]

१

आकाशांत असेल काय वरतीं कोणास ठावें असे ?
हे तारे असतील काय कसले ? संख्या जयांची नसे.
केले तर्कवितर्क फार तरिही वस्तुस्थिती नां दिसे.
जें प्रत्यक्ष दिसे तयाविषयिंची शंका न चित्तीं वसे.

२

नक्षत्रें, ग्रह, तारका, रवि, शशी कीं धूमकेतू तसे,
यांच्याही वसतिस्थळापलिकडे शोभा कशी ती असे ?
कैसें येईल पाहतां महिवरी अज्ञात-सौंदर्य तें
होतां कुंठित बुद्धि, मानव-मनीं दैवज्ञता वाढते.

३

आला स्वर्ग बघून कोण नयनीं ? आहे कसा तो वदा ?
जो स्वर्गीं शिरला फिरून वदण्या येईल कां तो कदा ?
त्याची सुंदरता जनांस न दिसे प्रत्यक्ष डोळ्यास ती,
अज्ञाताविषयीं महोत्सुक परी हें विश्व आहे किती ?

४

रत्नें सुंदर जीं कितीक भरलीं रत्नाकराच्या तळीं,
तीं येतील पहावयास नयनीं कोणास कां हो ! जनीं ?

त्यांच्या सुंदरतेस लोक मुकले लोकांसही तीं तशीं,
भोक्ता, भोग्य परस्परास मुकतां चिंता गमे मानसीं !

५

पुष्पाची कलिका अहा ! विकसली सौंदर्य-तेजस्विनी;
वायूनें सहजीं गळून पडली, वाळून गेली वनीं !
कोणाला दिसली न, कौतुक तिचें कोणीहि ना मानिलें,
व्हावें दंग निजस्वरूपिं अगदीं मानाहुनी वेगळें

६

गेले येउनिया जगीं बुध किती अख्यात जे राहिले;
गेलीं वाळुन मानवी सुकुसुमें कोणी न ज्यां सेविलें !
होतीं तीं गुणशालिनी रसिकही कित्येक होते इथें;
योगायोग विचित्र फार असती ! द्यावे कुणा दोष ते ?

७

आम्ही मानव ज्यास नित्य भजतों, तो देव कोठें वसे ?
ज्याला शोधित बैसले मुनि वनीं, अज्ञात तो का असे ?
ज्यानें सुंदरता जगांत भरली, सौंदर्य त्याचें कसें ?
अज्ञाताविषयीं विचार करितां तो पूर्ण ना होतसे !

# देवानंतर-वंद्य कोण?

[ शा० बि० ]

१

जें वाणींत कृतींत तेंच; असलें जे ब्रीद सांभाळिती,
येवो देह-निपातकाल तरिही सत्यास ना सोडिती,
आदर्शासम यच्चरित्र सकलां पाहावया लाभलें,
देवानंतर वंदितात असल्या लोकोत्तरांला भले!

२

खावीं कंदमुळें; प्रपातसलिल प्राशोनिया राहणें,
शय्या शैलशिलेवरी करुनिया दिग्यांबरा सेवणें
शास्त्रालंकृत वाग्रसज्ञ रतले जे तापसी ईश्वरीं,
देवानंतर सत्प्रणाम करणें तत्पादपद्मावरी!

३

कांतानेत्रकटाक्ष-बाण हृदयीं ज्यांच्या न ते भेदिती,
कामाचे नवपाश शक्त नसती बांधावया यन्मती.
आत्मोद्धार करून सज्ज जगदुद्धारासही जाहले,
देवानंतर वंदनीय असतीं त्यांचींच तीं पाउलें!

४

पाहावें इकडे सुवर्ण, तिकडे मुक्ताफळें उत्तम.
नाहीं अल्पहि लोभ, त्यांस गणिती जे मृत्तिकेच्या सम.
उत्कंठा परमार्थ मात्र घडण्या ती एक लागे मना.
**देवानंतर** ते मुमुक्षु जगतीं संपूज्य होती जना!

५

गेले या भवसागरांतुनि पुढें, जे वाळवंटांतुनी.
यत्पादांकित मार्ग धीर इतरां देई जनांलागुनी!
कीर्तीचीं हिमशैल–तुंग शिखरें स्वर्गावरी पोंचलीं!
**देवानंतर** शोभते प्रणति त्या विद्वज्जनांच्या पदीं!

६

लागे हात धुवून दैव कुलटे पाठीस ज्यांच्या सदा.
जन्मापासुन भोगिताल दुबळे येतलि त्या आपदा.
त्यांचें दुःख निवारण्यास रतले कीर्तीविना सर्वथा,
**देवानंतर** सज्जनांस नमुनी गाव्या तयांच्या कथा!

७

शैलाग्रावरुनी दिलें ढकलुनी विच्छिन्न झाली तनू,
शूलाग्रीं बसले तरी न चळले शीलाहुनी जे अणू,
अग्नीच्या शयनावरीहि निजले ब्रीदास संरक्षुनी,
**देवानंतर** वंद्य होति असले तेजस्वि लोकाग्रणी!

८

जे देशास्तव आत्मयज्ञ करुनी दिग्मंडळीं शोभले.
ज्यांचें सद्गुण-तेज पाहुनि नभीं तारे अहा ! लाजले !
स्वर्गाशीं क्षितिलोक तुल्य करुनी जे पावले धन्यता,
**देवानंतर** वीरपुंगव असे त्यांना नमावें स्वतां !

९

खालीं पाडुनि खड्ग-धार रिपुनें मानेवरी ठेविली,
कीं मत्तद्विरदेंद्र--भव्यचरणीं देहांत-शिक्षा दिली !
सत्यापासुनि होइना च्युत कधीं जो धैर्यशाली कदा.
**देवानंतर** योग्य होय नमणें सत्याढ्य मानास्पदा !

१०

तोफेच्या मुखिं बांधुनीहि उडवा, नाहीं तयाची क्षिती.
किंवा दुःसह बंदिवास घडला, आजन्म तो भोगती.
देशाचा अभिमान सोडिति न जे देशाभिमानी कदा,
**देवानंतर** योग्य होय नमणें ऐशा जनांच्या पदा !



# दोन प्रश्न.

( शा० वि० )

१

तूं देशास्तव सांग काय तरुणा ! केलें मनापासुनी ?
जातीचा कुणि ऐस, बंधु म्हणुनी भेटेन आलिंगुनी.
येथें विग्रह माजले, असशि कां त्यांतील तूं विग्रही ?
घे माझ्या नमनास, दूर सर बा ! जाळीतसे ही दुही !

२

विद्वत्ता, तप, काय आत्मिक तरी सामर्थ्य संपादिलें ?
ऐकूं दे, कुणि ऐस तूं, तुजपुढें हे बाहु विस्तारिले.
येथें सर्वचि शाहणे, असशि कां तूं एकही त्यांतला ?
घे माझ्या नमनास, मार्ग तुजला आहे तुझा मोकळा

* * *

जातीचा अभिमान सत्कृतिविना आहे वृथा सर्वथा.
द्वेषानें चढला कुणी तरि जगीं का उन्नतीच्या पथा ?
अतशुद्ध विचार आचरणही ज्यांनीं जनीं दाविलें,
जा, त्यांचीं पथ दावितील तुजला पूजार्ह तीं पाउलें !

# हे कोण ?

( अश्वधाटी--वृत्त )

१

चित्तीं स्वसंतुष्ट, कर्मीं तपोनिष्ठ, वेदांतसंनिष्ठ आम्ही असूं,
बोले जिथें 'नेति' वाणी अशी त्या चिदानंद-सौख्यांत आम्ही वसूं
वैराग्यवृत्तींत संसार हा जेंवि चालेल तेंवी सुखें चालवूं,
लोकीं परी लोक-कल्याण साधावया सर्वथा आयु हें घालवूं.

२

चैतन्य जें जीवजीवांत राही, नटे देह हाही तयानें मही,
नि सारिलें रूपभिन्नत्व तेव्हां दिसे एक चैतन्य सर्वत्रही !
कोणावरी राग आम्ही धरूं ? मत्सरद्वेष कोणासवें आचरूं ?
जाळोनियां विग्रहारण्य तेथें नवप्रीतिचे बाग आम्ही करूं.



# आणि हे कोण ?

( अश्वधाटी-वृत्त )

१

गोब्राम्हणांना अम्ही रक्षणारे, न केव्हांहि तद्दु:ख पाहूं शकूं
धारांगणीं खड्गधारी अम्ही, 'धन्य' लोकोक्ति कानीं सुखें आयकूं
ढालेवरी वैभवोनी झणीं लक्ष्मिला वाद्यघोषांत आणूं घरीं
कल्याण साधावया जन्मभूचें असे आमुची देहयात्रा खरी !

२

हीं येथलीं वैभवें सर्व नि:सार त्यांची मनाला अहंता नसो
त्या वैभवें दानधर्म प्रजापालनाचें महत्तत्व चित्तीं वसो
देशांतले लोक ते बंधु मानून चित्तांत ऐक्यास ना विसरूं
जाळोनिया विग्रहारण्य तेथें नवप्रीतिचे बाग आम्ही करूं.

# महाराष्ट्रीय

( शा० वि० )

१

' काढी हात गळ्यांतुनी प्रियतमे ! कर्णी पहा गर्जतो.
कोठें तें मम खड्ग ? आण नृपती देशार्थ बोलावितो !'
सग्रामोत्सुक वीर जाय, ललना पाही गवाक्षांतुनी;
देशोद्धारक वीरपुंगव असे गेले इथें गाजुनी.

२

स्वर्गाची अमरावती वसविली ज्यांनीं नगाच्या शिरीं,
इंद्राच्या धनुराकृती उभविल्या मालाहि दारावरी.
खालीं आणि वरी तसा दिशि दिशीं आनंद विस्तारिला,
त्यांचा वंशज-संघ हाय ! कलहीं कैसा रमूं लागला !

३

आले जीव मुठींत जे धरुनियां दिल्लीहुनी खालतीं,
शस्त्रें टाकुन ते फकीर बनती भिक्षेसही लागती !
ज्यांनीं धाक असा रिपूस दिधला, गेले इथें शोभुनी—
त्यांचे दिसतात, ते न दिसती योद्धे मराठे जनीं !

४

झाडींतून उफाळले, गिरिगुहा यांतून आले पुढें.
हे पंचानन मावळांतिल जणों लंघून आले कडे ?
ज्यांना पाहुनि शस्त्रही विसरुनी सेना परांची पळे,
कोणाच्या स्मृतिंतून जातिल महाराष्ट्रीय ते मावळे ?

५

द्वारीं मंडप पुत्रलग्नसमयीं घालावया लागले,
तों आलें निजदेशकार्य पुढतीं तैसेच ते धांवले !
आधीं देश, पुढें स्वकार्य, वसली सद्भावना ही सदा !
स्वार्थी निस्पृह ते कुठें जन, कुठें हे प्रीय ज्यां संपदा ?

६

संग्रामीं लढता असह्य बसला मर्मस्थळीं घाव तो,
पुत्राला कथण्यास वीर निधनीं संदेश कीं धाडितो·
" शूरांच्या सुकुलांत शूर निपजे ही प्रत्यया आणुनी. "
बापापासुन पुत्र नातु खपले राष्ट्रीय संवर्धनीं !

# तरवारीचे वार

[ चाल—चन्द्रकांत. ]

१ कुठें साहिले तरवारीचे हे इतुके वार?
वाहविला रणशूरा! कोठें रक्ताचा पूर?

* * *

" कोण चढवितो आज बावटा तटावरी पाहूं?
रायगडाचा भूप बोलला फुरफुरले बाहू!
दंतपंक्ति ओष्ठावरि चढल्या, चढल्या वर भुंवया,
' हर हर ' म्हणतां सेना चढल्या कमरा बांधुनिया!
स्फुरणाची शक्तीसह लागे रणांगणीं पैज,
गर्दीमध्यें गारद झाले किति गर्दनबाज!
स्वदेशभक्ती, स्वराज्यनिष्ठा, स्वकुलाचा मान—
संरक्षाया धरून बावटा चढलों बेभान!
खणाखणी जाह्‌ली, लाविलें निशाण परि वरती,
तरवारीचे वार शोभती ते हे तनुवरती!"

२ सांग तुझ्याही तनुवर पडले हे कोठें वार?
गाजविली राष्ट्रास्तव कोठें विजयी तलवार?

* * *

"शत्रूनें चालून घेतलें जरिपटक्यावरती,
करित गर्जना सह्याद्रीचे सिंह पुढें सरती.
भाले सुटले, हात पोंचले कटिच्या खड्गाला.
रिपुनें पहिली तोंच सलामी दिधली ढालेला !
रक्तासह वक्षस्थळ उसळे, वस्त्रासह बाहू,
हुंकारासह निर्धाराचा वाहतसे वायू !
क्रोधें चढतां परस्परांच्या कंठावरि हात—
गिरिसरितेसह शोणित-सरिता जाती वाहात !
रिपुनें चढत्या अवसानानें केला हैदोस;
मारकऱ्यांच्या माना तुटल्या पडल्या धरणीस !
स्वामिभक्तिच्या, कर्तव्याच्या भरल्या अवसानीं—
हाणामारी करित काढिलें निशाण मैदानीं !
झुंजत होतों जरिपटक्याला घेउनिया हातीं,
तरवारीचे वार लागले तंव हे तनुवरती !"

# विजयि मराठा

[ चाल-चंद्रकांत ]

महाराष्ट्रदेशाची वैभवरेषा उजळीत-
विजयि मराठा आला आला घोडा उधळीत ! १
जन्मभूमिच्या भंवतीं नाचे रिपुची तरवार,
करून आला धडकीसरसी बोथट ती धार ! २
रायगडाच्या धुरंधराचा हा पंचीप्यारा,
विजयि भवानी तरवारीच्या मुठींतला हीरा ! ३
महाराष्ट्रलक्ष्मीच्या किरिटीं रत्नांची माळ,
वीररत्न हें एक त्यांतलें तेजस्वी लाल ! ४
परवशतेच्या द्वारांतूनी उठला आक्रोश,
मूर्तिमंत मावळ्च्या रक्ताचा हा आवेश ! ५
निजभाग्याच्या सोपानानें देशाचें भाग्य-
बद्धपरिकर प्रगाढ चढवी वीर महाभाग ! ६
वीर्यशालिनी समर्थ-वाणी समर्थदासांची-
भिनली यद्हृदयांत मूर्ति ही मर्द मराठ्याची ! ७
जिजाउच्या उपदेशाचीं जीं उत्तेजक वाक्यें—
कानीं पडलीं ओझरतीं, तत्प्रभाव हा फाके ! ८

सह्यगिरीचा असह्य विक्रम हा त्याचा गोळा,
पातशाहिच्या द्वारावरची फोडी जेजाला ! ९

खडाड् झालें, ढाल उडाली, पडली धरणीला.
' छत्रपतीकी जय ' बोलोनी लपेटिला शेला ! १०

घाव लागले, रक्त वाहिलें, शुद्धि न देहाची.
एक महत्वाकांक्षा भरली शिवमागल्याची ! ११

चंद्रकोरिचें निशाण भिडलें भगव्या झेंड्याला.
'दीन' शब्द तो दीन जहाला 'हर हर' घोषाला ! १२

पुण्याकांक्षा, पुण्यमनीषा, त्यांचा समवाय—
पुण्यजयाच्या जयमुद्रांनीं सजून हा जाय ! १३

मृत्यूच्या छातीवर रोंखुन अजस्त्र भाल्याला--
स्वातंत्र्याचा वीर पुकारा करीत हा आला ! १४

रायगडाची भव्य पताका ही स्वागत करिते
जयलक्ष्मीच्या जयवंताला 'जयोऽस्तु ते' वदते ! १५

# पुरंदरचे गडकरी

( गझल )

प्रतापी गडकरी गाझी मुरारी हा पुरंदरचा
निघाला वाजवुन डंके करारी विजय–मरणाचा ! १
चढोनी रक्त नेत्रांत दिसेना पुत्र घरदार
भरोनी शिराशिरी अंगीं निघाले सर्व सरदार ! २
परीक्षा आज शौर्याची परीक्षा आज धैर्याची
परीक्षा हिंद वीरांची नव्हे छे !–हिंदराष्ट्राची ! ३
क्षितीचा गोळ कांपेल नभाचा गोल हालेल
मराठा आज प्रत्येक गुलाली रंग उधळील ! ४
प्रतापी हात खड्गाचे यशस्वी हात भाल्याचे
यशाचे लेख इतिहासीं लिहोनी ठेवितिल साचे ! ५
सफेजंग होउनी जाऊ शिवाचें नांव वा ठेवूं
गडाला स्वर्ग तो आणू इथें वा स्वर्गती पावू ! ६
पहाडी मावळे शूर धडाडी घेउनी आज
विजेच्या चंद्रकोरीचा क्षितीला उतरतिल साज ! ७
लढाई आज हुतुतूची चढाई दात निकसीची
करोनी मर्द लढतील गळ्याला खड्ग भिडतील ! ८
मराठी राजनिष्ठेला मराठी देशभक्तीला
कवींनीं सर्वदा गावें शरीरीं त्वेष हा आला ! ९

# निर्वाणीची वाणी


जेव्हां चोहोंकडून आभाळ फाटलें तेव्हां ऐनगर्दीत तुकोजी शिंदे भाऊसाहेबास म्हणाले—"महाराज! क्षात्र-धर्माची वार्थ झाली. याउपरी निघावें हे उत्तम आहे." तेव्हा भाऊसाहेबांनीं उत्तर केलें—"तुकोजीबाबा! अतां कोणीकडे जावें? रावसाहेबांची (विश्वासरावाची) गत काय झाली ती पहावी! आता नानासाहेबांस तोंड काय दाखवावें! शिवाय इब्राहिमखान गारदी यास इनाम दिलें तें काय? तरी निघावें अशी गोष्ट कदापि घडणार नाहीं. रणाचे ठायीं ईश्वरसत्तेंकरून जें घडणार असेल तें घडेल; परतु कदापि नामोहरम व्हावयाचें नाहीं."

( गझल )

करोनी विजय-घोषास लिघोनी जाय विश्वास.
अपेशी तोंड नानास निघूं कां दाखवायास ?

इमानी गारदीखान दिला त्या बेलभंडार.
"जिथें ठासून राहाल कत्ल मी तेथ होईन"
पहा तो गोल बांधून लढे या भाउचा प्राण.
करोनी त्यासि बेमानी ठरूं नामर्द बेमान ?

स्वतांच्या शौर्यधैर्यानें परांना लेखिलें नाहीं.
अतां कां पाठ फिरवूं मी ! नका हे शब्द बोलूंही !
फिराया कल्पना येतां मला 'धिक्कार !' ऐकूं ये.
जणो तो शब्द अप्पांचा नभीं तन्मूर्ति मी पाहे !
" निदानीं लेइजे प्राण निदानीं देइजे प्राण. "
असा हा मार्ग सोडून निघावें कोंवि येथून ?
भटांची ही पळी नाहीं भटांचा हा असे भाला !
कुतर्की तुर्क वदतील पळाला भट पळीवाला !
जयांच्या दर्भ हातांत— तयांच्या शौर्य रक्तांत,
जगाला दाखवुन त्याच्या— भरूं द्या नवल नेत्रांत !
रिपूंनीं घातला घोळ मला ना क्षिति भविष्याची.
पुढें जो ठाकला काळ करूं द्या धूर्तता त्याची !
फिका जो जाहला रंग मराठी लाल पगडीचा,
तियेला चढवितों रंग रिपूंच्या लाल रक्ताचा !
कुलाच्या कीर्तिगंगेंत स्वतांचें रक्त ओतीन;
मराठी चमक दावोनी समाधी तींत घेईन !



# कट्यार

कोटा संस्थानचा राजा अमरसिंग राठोड हा दिल्लीचा मांडलिक होता. तो स्वतःच्या लग्नास कोटा शहरीं आला असता, त्यास दरबारीं जावयास उशीर झाला, म्हणून वजीर सलाबतखा यानें त्यास जरबेचा खलिता लिहिला. हा वजीर शहाजहानचा मेहुणा असून, राठोडाचें त्याचें वाकडें होतें. आपल्या पतीचा मानी स्वभाव व वजिराचा दुरुत्तरें बोलण्याचा स्वभाव, यामुळें ही आपली कदाचित् शेवटचीच भेट असावी, असें जाणून ती नव-वधू आपली कट्यार पतीस देत आहे.

[ शा० वि० ]

१

काढोनी अपुली कट्यार युवती देई पतीच्या करीं
राहूं द्या जवळी, कटीस अपुल्या हे खड्ग आहे जरी.
झाला दासिमुळें विलंब नृपती—गेहास जाया झणीं;
आहे दुष्ट वजीर शब्द भलता काढील तोंडांतुनी !

२

तेव्हां तो अपमान साहतिल ना कोटापुराचे धनी,
रक्ताचे पडतील भीषण सडे तेथें सभारंगणीं !


खड्गाचा कर हा अडेल भिडुनी बाहूस बाहू यदा,
ही देईल कट्यार साह्य समयीं वीराग्रणीतें तदा !

३

मातें पत्निपदावरी चढविलें सभूषवीलें जगीं,
प्रीतीची मम हीच खूण सखया ! माहेरची देणगी !
ही तेजस्विनि ना यशस्विनि जरी झाली तुम्हा संगरीं,
मी घेईन करांत वाण सतिचें येईन राया ! वरीं !

४

केलें स्वीकृत शस्त्र तें, वळविलें दृष्टीस मोहांतुनी.
गेला भव्य तुरगमासह जवें राठोड–तेजोमणी !
झालें भाकित सत्य, मारुन मरे मानी सभेंत स्वतां
झाली दग्ध अहा ! चितेंत शिरुनी हाडाकुलाची लता !



# अर्ध्या वाटेंतून–

युद्धाला निघताना प्रथम भेट झाली, तेव्हा तिनें सांगितलें होतें कीं, "तुम्हीं धारातीर्थीं पतन पावला, तर मी चितेंत शिरून स्वर्गांत तुमच्या भेटीस येईन." तें युद्ध निर्वाणीचें होतें; त्यातून परत येण्याची आशा नव्हती; म्हणून ज्याच्या विवाहाचें कंकणही अजून सुटलें नव्हतें, अशा त्या १८ वर्षांच्या रजपूत चोंडावत सरदारानें पुन्हां अर्ध्या वाटेंतून राणीस निरोप पाठविला कीं, "माझ्या मागें तुम्ही खरोखरच स्वर्गीं याल ना ?" तो निरोप घेऊन येणाऱ्या दूताजवळ तिनें आपलें डोकेंच कापून दिलें !

[ शा० वि० ]

१

होतें सांगितलें तिनें, "पहुडलां तुम्हीं रणीं,–ऐकतां,
मी येईन चितेंत नाथ ! शिरुनी भेटावयाला त्वरां !"
होतें ठाउक त्यास निश्चित, रणीं मृत्यूविना ना गती !
स्वर्गीं येईल ना परी प्रिय सखी ? चिंता मनाला अती.

२

लग्नाचें सुटलें न कंकण, पहा योद्धा चढे संगरीं !
भीतीनें गतिबद्ध होय परि तो अर्ध्याच मार्गावरी.

विश्वासू निज सेवकास जवळी बोलावुनी तो वदे;
जा, जाऊन सखीस सांग ' वरतीं येशील ना तूं मुदें ?'

३

केव्हां येइल दूत आणि सखिचे ते बोल ऐकू कधीं ?
कर्तव्याचरणांत घात करितो थोडाहि कालावधी !
होती दृष्टि पथाकडे, विरहिणी आशा धरूं लागली.
तों कांता-शिर दूत घेउन वळे, प्रीती अहा ! कांपली.

४

हातीं देउन शीर्ष, दूत वदला भाषा शिराची तदा-
" गेल्यें स्वर्गीहिं मी, तुम्ही ढळुं नका स्वक्षात्रधर्मा कदा
ऐसें जाउन सांग, आणि शिर दे माझें तया नेउनी. "
राणीचे वच हेंच अत्य, दिधलें शीर्षास या कापुनी !

५

' हा ! हा ! ' बोलुनि शीर्ष तें निजहृदीं आलिंगिलें, चुंबिलें
आतां वाचुन काय सार्थक तरी ? कर्तव्य संचारलें !
वीराचा ' जय एकलिंग !' समरीं जो घोष हो गाजला;
त्या घोषासह अंबरीं गृहिणिच्या भेटीस तो धावला !

# रणभूमी

—※—

(दिंडी)

१

जन्मभूचें दुर्दैन्य निवाराया,
सजे शस्त्रासह धीरवीर-काया !
अशा शूरांची अंत्यशयन-भूमी,
तिला पाहतसें साश्रु लोचनें मी.

२

शिंग, भेरी, डफ, दुंदुभी, नगारे.
वाद्य-घोषें समरज्ञ वीर सारे-
जिथें गेले उडवून ते धुमाळी,
तिथें नांदे आजि शांतता निराळी !

३

राउताला राउत जैं मिळाले,
समर-धूलीचे लोट वर उडाले;
तदा ' हर हर ' जो वीर-घोष झाला,
न ये श्रवणीं तो आज ऐकण्याला !

४

शत्रु जरिपटक्यावरति धाव घेई,
चपल खड्गांची होय हातघाई!
गळे आर्यांचें रक्त पुण्यधामीं.
तिथें बाष्पांजलि दीन अर्पितों मी!

५

जसा वृक्षीं द्विजनिवह लो उडावा,
मेघधारांचा पात जसा व्हावा,
तेंवि बाणांची तुमुल वृष्टि होतां-
धैर्यशाली-गण झुंज देत होता!

६

शिरें लावुन आकाश तोलतील,
वज्र पडलें स्थळ तरि न सोडतील
विजय मिळवावा, देह वा त्यजावा.
इथें गेले प्रकटून वीरभावा!

७

करी वृष्टी उल्हाद-यत्रमाला,
जणों मेघांचा गडगडाट झाला!
कोट छातीचा बांधुनी निघाले,
स्वदेशाच्या कामास वीर आले!

८

शस्त्रभिन्ना विच्छिन्न तनु जहाली,
रक्त वाहोनी ग्लानि तिला आली!
खड्गधारी तैं देव-पुरीं गेले
इथें तद्यश चिर मात्र राहियेलें!

९

देशसेवाव्रत राष्ट्रभक्त शूर--
समरशास्त्रप्रज्ञात भीमवीर--
इथें निद्रा मात्रंकिं ज्यास लागे,
कधीं होतिल ते वीर पुन्हां जागे?

१०

जेथ उत्कंठा, भावना, मनीषा,
थोर अभिलाषा, विजयमंगलाशा,
शौर्यधैर्यादी गुण-गण प्रकाशे,
तिथें भारत--भू टाकिते उसासे!

११

खड्गधारी भट रुधिरलिप्त देहीं—
जन्मभूमीस्तव जाहले विदेही!
मेघरूपें येऊन पाहताती;
बाष्पधारा गाळून परत जाती!

# * देवगिरी

स्वातंत्र्यीं शोभतसे अमरपुरि-विलासें,
आज परी देवगिरी दुःखगिरी भासे !
धवल फेन ज्यांत दिसे
हिमराशी तरळतसे
तो अंभोनिधि हांसे-
यजयरव-हर्षे-आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! १

स्वलक्ष्मी करि वसती
देवासम भूप असति
म्हणुनि लोक ज्यास वदति-
' देवगिरी ' ऐसें-आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! २

ध्वज सिंहांकित शिखरीं
फडफडवी वायु-लहरी
यदु-विभव प्रकट करी
धीर मद विलासें-आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! ३

---

* देवगड उर्फ दौलताबाद.

बुरुजाबुरुजावरतीं
सैनिकजन ललकारिति
शस्त्रांनीं सज्जुन फिरति–
वीरपदन्यासें--आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! ४

दुर्ग--नरेशापुढतीं
देशदेशचे नृपती
किरिटांतें लववीती
यत्कृपाभिलाषें--आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! ५

मातृमुखीं स्रवणारें
राष्ट्र–गीत शिशु सारे
ऐकति संतोष–भरें--
हस्तपाद -लास्यें–आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! ६

रणवाद्यें श्रवण करुनि
कांता--करपाशांतुनि
युद्धोत्सुक वीरमणी–
धावति आवेशें--आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! ७

गजघंटा घणघणती
हयपादध्वनि उठती
वीर -भुज स्फुरण करिती--
युद्ध-वाद्य-घोषें आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! ८

रुधिरलिप्त खड्ग फिरति
जणु रविचे किरण सुटति
देवगिरी- रिपुवरती--
पडति महारोषें--आज परी देवगिरी दु:खगिरी भासे! ९

देशास्तव तात मरे
वार्ता ही श्रवणि शिरे
पुत्रांगीं त्वेष भरे--
यत्प्रेमावेशें—आज परी देवगिरी दु:खगिरी भासे! १०

तोफेवरि एक हात
एक हात रिपुशिरांत
झुंजति भट निर्भयांत—
शौर्यगुण-विशेषें-आज परी देवगिरी दु:खगिरी भासे! ११

' हर! हर! ' भट-कंठध्वनि
परसैनिक आयकुनी
हर हर वदती वदनीं--
पळत भय-त्रासें-आज परी देवगिरी दु:खगिरी भासे! १२

वपु रिपुशोणित--सिंचित
युद्धरज'कणमंडित
येई चमु हर्षभरित—
जयसूचक-वेषें-आज परी देवगिरी दु:खगिरी भासे! १३

पंचारति निजकरांत
स्थापियला हार ज्यांत
ओवाळिति सुखभरांत
पत्नि निजपतीतें आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! १४
असतें यत्काव्य जरी
मेरूचें काव्य तरी
घेती ना कोणि करीं
रसिक समुल्हासें-आज परी देवगिरी दुःखगिरी भासे !१५

* * *

स्वर्गपतीच्या चरणीं
वसली जी दिनरजनी
ती लक्ष्मी ज्यास जनीं–
भूषवी निवासें–आज परी देवगिरी दुःखगिरी भासे !१६
लक्ष्मीस्तव आलेल्या
सावित्रि देवि मोदजला
तीं रत्नें कंठतला--
वरिति युवति हर्षे- आज परी देवगिरी दुःखगिरी भासे !१७
गिरि बघण्या येति देव
थबकति गगनांत सर्व
तारे, नच, सुर अपूर्व–
अवतरती कैसे ?–आज परी देवगिरी दुःखगिरी भासे !१८

शैल गर्भे रविकिरणीं—
भारतोदरस्थ—मणी
अमरिणि—मानस—कमलिनि—
हसति मुख-विकासें आज परी देवगिरी दु:खगिरी भासे! १९

यादव--कुल--नृपरमणी
कुलभूषण—सुत--जननी
देवताच त्या गणुनी—
चंद्र अमृत वर्षे--आज परी देवगिरी दु:खगिरी भासे ! २०

कमलरम्य पुष्करिणी
सुममंडित निर्झरिणी
पौरजनांत:करणीं—
तोषिती विलासें--आज परी देवगिरी दु:खगिरी भासे ! २१

रूपानें चंद्रकला
देहानें ज्या कमला
प्रकटिति जणु मदन-कला--
सुंदरी कटाक्षें--आज परी देवगिरी दु:खगिरी भासे ! २२

उपवनिं नव कुंद कळ्या
सुप्रभातिं ज्या फुलल्या
धवलांगी कृतिकुशला--
गुंफिति प्रकर्षे- आज परी देवगिरी दु:खगिरी भासे ! २३

उद्यानांतिल वनिता
कुसुमें वेंचित असतां
वेणीवरि ललित लता—
दाळिती सुपुष्पें—आज परी देवगिरी दुःखगिरी भासे !२४

स्तनमंडलिं बकुलहार
चंदन--उटि तनुस गार
वळाति युवति सौधिं फार--
पद-कमल-विभूष्यें-आज परी देवगिरी दुःखगिरी भासे! २५

ताप तरी मदनाचा
राग तरी प्रणयाचा
जेथ खेद विरहाचा--
होय, नान्य-दोषें--आज परी देवगिरी दुःखगिरी भासे !२६

काळजी न काळजात
ना विकल्प कल्पनांत
दुर्मनन न तें मनांत--
लोक सुखी ऐसे--आज परी देवगिरी दुःखगिरी भासे !२७

आपदा न पद ठेवी
दौर्बल्य न बल दावी
राग तो विराग सेवी--
कर्तव्य-ध्यासें--आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ! २८

स्वाभाविक सुजनपणा
निष्कृत्रिम मित्रपणा
हे गुण जेथील जना-
परिचित अनुवंशें--आज परी देवगिरी दुःखगिरी भासे!२९

ललित-कला-शास्त्रविज्ञ
सत्काव्याचे रसज्ञ
होते ना अमित सूज्ञ
डुलवित नृपशीर्षें ?-आज परी देवगिरी दुःखगिरी भासे ३०

वाणीचे कंठमणी
पटु जे वेदाध्ययनीं
गेले स्थळ भूषवुनी
आत्मगुणोत्कर्षें-आज परी देवगिरी दुःखगिरी भासे! ३१

अखिल भारतीय धैर्य
सकलवंद्य आर्यशौर्य
एकस्थळिं करिति कार्य-
प्रेम-संनिकर्षें आज परी देवगिरी दुःखगिरी भासे! ३२

होइल हा अचल कदा
प्राप्त पुन्हां विभव-पदा!
पाहिन मी स्थिति सुखदा-
आनंदोच्छ्वासें-आज परी देवगिरी दुःखगिरी भासे!३३

# सावध रहा !

( चाल—काठेकाठ भरूं द्या पेला. )

रंग अघाडीवरचा फिरला फिरल्या पगड्या भरदार
बारगिरांचे नाइक झाले बीनीवरचे सरदार ! १
स्वतंत्रतेच्या सुधारसाचे प्याले प्यालेले गेले
फितुरीच्या डबक्यांतिल पाणी प्यालेले पुढतीं आले ! २
निःस्वार्थाच्या लोकहितावर लोभानें केली मात
स्वावलंबनावरती चढला परवशतेचा कीं हात ! ३
पिसाळ—वंशज पिसाळलेला सूर्याजी तज्जातीचे
घरभेदी विश्वासघातकी मिरजाफरच्या शीलाचे ! ४
होणारा गडगडाट झाला संकटपूराच्या वाटे
विंध्याचलवत् अचल राहतिल कसे नर्मदेंतिल गोटे ! ५
मत्कुण मत्सर यांच्या सेना हपापल्या नर—रुधिराला
गाद्यागिरद्या सोडुन पुढतीं उघड्या मैदानीं आल्या ! ६
रणकंदन करणारे, त्याच्या घोड्यांचे खिदमतगार
धडाडिच्या वीरांचीं कार्ये धडकीवाले करणार ! ७
धूराचा केवळ भपकारा ज्यांना पुरतो पळावया
ते तोफांच्या गोळ्यापुढतीं धजती आजी लढावया ! ८
धैर्य कशाचें ? दुरभिमानता; शौर्य कशाचें ? निग्रहता
फैर न झडली एक जोंवरी तोंवरची रणपंडितता ! ९
वर्णद्वेषी आग अंतरीं, लोकहिताचें वर ढोंग
कर्तृत्वाची धमक न अंगीं देशभक्तिचें वर सोंग ! १०

वटवृक्षाच्या पारंब्यांची मुळें पसरलीं भंवतालीं
प्रशांत पर्णच्छाया त्यांची कधीं कुणाला कां गमली ? ११
कुंपण सोडुन निवडुंगांनीं शेत व्यापिलें सर्वत्र
धान्य-फळें कोठलीं ? परतू दुर्गम करिती स्थल मात्र ! १२
दिसावयाला सुंदर तोफा, आंत बाजरी भरलेली
पराजयाची भोळ पताकेवर वाचुन घ्या लिहिलेली ! १३
पायापुरती दृष्टि जयांची स्वदेशबंधूंचे द्वेषी
पक्ष उभविती सहाय करिती विपक्षियांना निजदेशीं ! १४

* * *

शिवरायाची एक भवानी तिजवर एकीचा लेख
शिव ! शिव ! वर्णद्वेषाचा शिववशज करिती अतिरेक ! १५
शिवरायाला सकल मानिती जनार्दनाचा अवतार
जनीं जनार्दनरूपी झाला शिवरायाचा संचार ! १६
मेंढपाळ कुणि असो जातिचा जातिवंत सरदार हवा
सर्व जातिचे एक निशाणाखालीं आम्ही लढूं अहा ! १७
बारगीर कुणि कर्तृत्वानें शिलेदार जाहला जरी
धुरंधराच्या भाल्यासगें चमकवुं नंग्या समशेरी ! १८
भारत-भूमीच्या भाग्याची भव्य भावना परि नुरली
भलीं माणसें भुतें जहालीं शितें पाहुनी भ्रमिष्टलीं ! १९
दुही माजली अधिक वाढली शिवरायाच्या या राष्ट्रीं
शिवरायाच्या अभिमान्यानों ! सावध राहा संकटीं ! २०

# केवळ मानासाठीं !

( चाल–कांठोकाठ भरुद्या पेला. )

स्वार्थत्यागावांचुन केली बडबड देशप्रेमाची
क्षुद्र भावना हृडळ पोसिली अंतरांत बहुमानाची ! १
शिलेदार म्हणवून घेतलें बांधुन पाठीशीं ढाल
शिलेदारिची चाल दाखवी आंत मूळचा चवचाल ! २
तळमळ लागे, झोंप न लागे इतरांला राष्ट्रप्रेमें
हितास जागे स्वजन–घातकी देशद्रोही हा नेमें ! ३
स्वदेश आणि स्वजन तयांच्या मानेला द्यावी माल
मान कापुनी परंतु त्यांची झाला पापी बेमान ! ४
कितीक आत्मे तळमळले तैं कितीक हृदयें दुभंगलीं
नैराश्याच्या स्मशानांत किति सौख्याचीं प्रेतें पडलीं ! ५
संतोषध्वनि आनंदध्वनि जों न निघाले त्या आधीं
एकानें लाविला समस्तां दुर्धर चिंतेचा व्याधी ! ६
देश सोडिला, धर्म सोडिला, स्वजनांचा केला घात
त्यांचे वाडे सुखें नांदले कुणी पाहिले जगतांत ? ७
जन्मभूमिच्या दुर्भाग्याला द्यावा पुत्रानें हात
कां न तिनें मारोनी घ्यावा दुःखें निढळावरि हात ? ८
'बेमाना ! त्वां काय साधिलें ?' विचारील याला कोणी
मानाच्या स्वार्थाविण दुसरी भाषा येइल का वदनीं ? ९
लाज वाटते कथावयाला, असे जन्मती अमुच्यांत
कसा निघावा भारत–भूच्या दुःखी भाळाचा हात ? १०

# तो काळ असता तर—

( शिखरिणी )

१

जरी ते पूर्वींचे दिन भरतभूमीस असते,
तिच्या कंठीं तेजें गुणि नर-मणी जे विलसते;
तिलाही ज्यांचें तें अमित गमतें भूषण सदा,
अहा ! आजी त्यांच्या मतिस जडली दास्य-विपदा !

२

जरी स्वातंत्र्याचा समय असता तोच रुचिर,
तरी ज्यांची कीर्ती असति नृपनीतिज्ञ-चतुर;
पहा त्यांनीं बुद्धि-क्रय करुन अर्थित्व वरिलें,
पराधीना वृत्ती गुण विकसुं देईल न भले !

३

स्वशौर्यें संग्रामीं रविस रुधिरीं लिप्त करिती,
स्वबाहूच्या योगें धरणि-धर शेषा लववितो
स्वराज्याच्या काळीं भरविति जयानंद-सरिता,
स्वतःचीही त्यांना अवगति न येई निरवितां !

४

जिथें भूमातेचा नयनजलबिंदूहि ठिपके,
तिथें यत्क्रोधाचा अनल न बघाया रिपु शके !

पहा दुर्दैवाच्या गतिपुढति एकेक सरती
रडे भूमाता ही, रडति सुतही कालमहती.

५

महज्ञानी, शास्त्री, रणपटु, कलाविज्ञ, सुकवि,
जगाची प्रत्येक भ्रुकुटि चढवी, शीर्ष डुलवी !
यदीया सौराज्यीं असति महती पूर्ण कळली,
जसा वारा वाहे फिरविति तशी पाठ अपुली।

६

रडे भूमाता ही, कुणि म्हणति–'हांसें;' तरि खरें
असे 'दुःखी,' कोणी म्हणति 'सुखि आहे;' तरि बरें!!
असे सत्यालापी नयन भरुनी अध बनती,
रहाती ती वेळा ठरति बुध ते निस्पृह–मती !

७

असे बंधू जे जे दिसति विगुणी दुःस्थितिमुळें,
कुणी दोषो त्यांना, परि मति मदीया हळहळे.
हिरे जातीचे जो असुन पिशुनीं काच ठरवी,
असो धिक् काळाला, उलट अजुनी चक्र फिरवी !

# जागृति

—*—

(शा० वि०)

१

जेव्हां भारत राजदुष्टपुरुषीं दुःशासनें गांजला,
धर्मालंकृत काननात शिरले, दुस्ताप त्यां जाहला;
तेव्हां संमुख अर्जुनास करुनी गीतार्थसद्बोधक--
झाला श्रीयदुनाथ भारतजना तो जागृती प्रेरक.

२

कर्माचारचि माजला. दिसुन ये वेदार्थ--विश्लेषता;
नाना शास्त्र–वितंडवादवचनीं धर्मास ये म्लानता;
कृष्णाचे अनुवादक प्रकटले श्रीशंकराचार्य ते
गेले जागृतिनें विभूषवुनि या पुण्योत्तमा भूमितें !

३

होता वाढत यावनी मद, रडे धर्म स्वदुःखें यदा,
गेहीं गेहिं करी विनर्तन महाराष्ट्रांत दास्यापदा,
घालोनी कफनी 'समर्थ' उठले द्याया जना जागृती,
कृष्णाचे प्रतिपादक प्रकटले स्वामी इथें भारतीं !

४

ज्यांनीं रायगडावरी चढविली भव्य स्वराज्यध्वजा,
यच्छत्रांकित 'धन्य! धन्य!' वदली स्वातंत्र्यभोगी प्रजा
यन्नामस्मृतिनेंच धैर्य वरितें प्रत्येक लोकांतर,
गेले जागृतिचे प्रवर्तक 'शिव' प्रख्यात लोकेश्वर!

५

होते गर्जत जन्मभूमिकरितां जे आंग्लविद्वत्सभीं,
शेषाधार धरेस या बुडविलें ज्यांनीं यशःसौरभीं!
'दादा भाइ' पितामह प्रथित ते 'श्रीबाळ गंगाधर
गेले जागृतिचे प्रबोधक दिवस्थानांत विद्वद्वर!

६

ज्यातें शत्रु तसेच मित्र नमिती, लोकीं महात्माच जो!
'विश्वश्रेष्ठ' म्हणून विश्वजनता यत्सद्गुणातें भजो.
उक्तांचा अनुवर्तक स्वनियमीं गांधी महात्मा क्षितीं–
वाणीनें कृतिनें स्वदेशभुवनीं देई जना जागृती!

---

# देशभक्त

( वृत्त–रथोद्धता )

१

देशभक्ति निजकार्य हें पुढें,
लोकभार शिरिं ज्याचिया पडे.
त्याविना इतर मानवांस बा !
' देशभक्त ' पदवी सु–दुर्लभा !

२

आत्मसौख्य न दिसे जया कधीं,
देश–दुःख मनिं कल्पनावधी !
कष्टतो निशिदिनीं तयामुळें,
' देशभक्त ' पदवी तया मिळे !

३

झोंपतात जन हाच जागतो !
चिंतनांत रजनीस कंठितो !
भारतीय उदयास वांछितो !
' देशभक्त ' कवि–वर्णनीय तो !

४

व्यर्थ दंड पडला तरी पडो !
बंदिवास घडला तरी घडो !
जन्मभूमि नयनापुढें उभी !
' देशभक्त ' बुध तोच धैर्यधी !

५

सेवितो कधिं रसान्न-भोजनें,
खाउनी कधिं कदान्न राहणें !
कष्टतो परि जनार्थ, तोच तो-
' देशभक्त ' पदवीस पावतो !

६

चालवी अतुल खड्ग-लेखणी,
शक्त शत्रुहृदय-प्रहारणीं !
बुद्धिमान म्हणवी बुधाग्रणी,
' देशभक्त ' पद योग्य त्या जनीं !

७

न्या तयास हिमशैल-शेखरीं,
द्या तिथून ढकलून भूवरी !
अंतिंही जप मुखांत ' भारत, '
' देशभक्त ' पद तद्यशांकित !

८

क्रूर काळ तनु–घातकी हसे,
लक्षही परि तयाकडे नसे !
मातृभूमि–हितरक्षणीं रते
' देशभक्त ' पद त्यास सेवितें

९

' राजमान्य ' असती घरोघरीं !
' राव ' ही मिरविती बहादुरी !
' श्रीयुतादि ' जन–वृंद राजतो !
' देशभक्त ' विरळाच जन्मतो !

# लोकमान्यांचें तेज

( चाल—चंद्रकांत )

पूर्वी तर हांसली प्रमोदें, पश्चिमाहि डोले,
लोकमान्य-तेजानें सारा भूमि-गोल हाले ! १

चमकत होते परप्रकाशित लुकलुकते तारे,
बालरवीला पाहुन दिपले लपले ते सारे ! २

परदास्याच्या द्वारीं घोरत होता पडलेला,
त्या तेजानें जागा झाला भारत निजलेला ! ३

स्वराज्य-कंकण बांधुन सजले लढवय्ये आज,
त्यांच्या हृदयांतरींहि चमके लोकमान्य-तेज ! ४

स्फुरवी जें राष्ट्रीय-भावना नित अंतःकरणीं,
त्या तेजाचीं कवि आनंदें गाताती गाणीं ! ५

# " लोकमान्य गेले ! "

१

मोहव्याप्त क्षणभर निजे हिंदमाता निशीथीं,
तारा, तारापति घनपटीं झांकुनी तोंड घेती;
अंभोदांचा गगनिं भरला शब्द तों दुःखजन्य—
' गेला बाई ! प्रियकर तुझा लाडका लोकमान्य ! '

२

ज्यातें अंकीं, कटिवरि कधीं घेउनी खेळवीलें,
यन्नामाचा जप तव मुखीं कौतुकें नित्य चाले,
आशा होती वसत हृदयीं हाच फेडील पांग—
आतां कोणावर दिन तुझे हाय ! जातील सांग !

३

ज्या काळानें अजवरि तुला दुःख–पंकांत नेलें,
त्यानें माते ! पुनरपि तुझ्या रिक्त अंकास केलें !
मागें लागे तव अवदशा केविं सोडील पाठ ?
दुःखाब्धीची विषम उठते हाय ! एकेक लाट !

४

आजी पूर्वक्षितिजिं मुख कां दाविना बाल-सूर्य ?
आलें राया ! कळुन सगळें ओढवे नष्टचर्य !
आल्या लाटा जरि जलधिला तीव्रशोकें विशाला,
अन्या वार्ता विषम तरि तो काय बोलेल बोला ?

५

सश्रीयांचा अधिपति निजे रुग्णशय्यीं ज्वरानें,
तारायंत्र-ध्वनि ' कड कटा ' ऐकती लोक कानें.
दुर्दैवाची कटकट पुरी बाधली आर्यलोकां,
' एखाद्याची अशुभ असते दुष्ट वाचा विलोका ! '

६

पुण्यश्रोणी तनु तनुवरी टाकि मुंबापुरीच्या !
विख्याता या उभय भगिनी सत्य एका जिवाच्या !
' बाळा ! बाळा ! ' करित रडल्या, जाहल्या त्या विलापी !
ना येई हो ! भरून जगतीं काळ-हानी कदापी !

७

पंजाबाची धरणि विकला हुंदके देत आली !
वैदर्भीय क्षिति तर निघे हात लावून भाळीं !
झालें साध्वी-हृदय तरिही गुर्जरीचें दुभंग !
बंगालीनें तर परिसतां टाकिलें हो निजांग !

८

प्रांतोप्रांतीं शहरशहरीं जाहल्या शोक-शाला !
प्रत्येकाच्या हृदयिं शिरला दुष्ट हा एक भाला !
कोणी मृत्युंजय जप करा, कीं अनुष्ठान घाला,
' येणारा तो चुकत नसतो मृत्युचा तीव्र घाला ! '

९

स्वर्गी गेला शिव-नृप यदा राज्य संपादणारा,
केवीं नेत्रांतुन निखळल्या तैं महाराष्ट्र-धारा ?
कैशीं झालीं अमित हृदयें दग्ध शोकानलानें ?
होई ज्ञात स्थिति सकळिकां आजच्या कल्पनेनें !

१०

जेव्हां अंतीं हर ! हर ! कुरु-क्षेत्र रक्तांत न्हालें,
तेव्हां लक्षावधिहि अबला-जीव दुःखीं बुडाले;
होई हो ! स्त्रीपुरुष-गणती आजची तीस कोट,
एका बाळास्तव गळतसे एवढा अश्रुलोट ! !

११

नानावर्णी विकल जनता बोलते हाय ! तोबा !
ठेवी कष्टें कर कटिवरी पंढरीचा विठोबा !
आश्चर्यानें स्वमुखिं जडली अंगुली रुक्मिणीची !
दुःखें वक्रा गति अजि दिसे चंद्रभागा-तनूची !

१२

होती चित्तीं रुचिर धरिली भारतानें मनीषा,
स्वातंत्र्याची पुरविल महाभाग हा मात्र आशा !
हा ! हा ! त्याच्यावरिहि वळली कालमूर्ती कठोरा !
आतां झाला अगदिं उघडा मात्र येथें पसारा ! !

१३

'ये ये काळा ! उचल !' म्हणती, त्रासले जे जिवातें–
दुःखी कष्टी जरठ जन का थोडके येथ होते ?
कोशागारांतिल उचलला नेमका कोहिनूर !
लाधायाचा फिरुन कसला ! फाटतें हाय ऊर ! !

१४

राहे रत्नागिरि नगर जें भव्य रत्नाकराशीं,
तेथें रत्न प्रकटुन खुले हिंदभूच्या गळ्याशीं;
देवा ! देवा ! मणि असुनिया कौस्तुभाचा गळ्यांत,
त्यापेक्षां हा अधिक गमला काय ? नेला नभांत ?

१५.

यत्कीर्तीचा परिमल दिशा मोहितो तो दहाही.
पुष्पें त्याच्यावर उधळिलीं यांत आश्चर्य नाहीं.
घांसी लोकांस्तव वपु सुखें चंदनाच्यापरीस,
काष्ठें त्याच्या उचित असतीं चंदनाचीं चितेस !

१६

स्वर्गीं नेतां बसवुन तया देव-वैमानिकांनीं–
मार्गें मार्गें असतिल अहा ! नेत्र पाहात दोन्ही !
तन्नामाचा गजर गगनीं थोर झाला असेल !
नेत्रें झालीं असतिल अहा ! देवतांचीं विलोल !

१७

दादाभाई असतिल तिथें, गोखले, नामजोशी–
तो गोपाल प्रियतम सखा वद्य ते विष्णुशास्त्री–
मागें ज्यांच्यावरि विबुध ते भार टाकून जाती,
तेही आले टिळक, म्हणुनी त्यांस वाटेल खंती !

१८

विद्वानांचा अधिप विबुधश्रेष्ठ लोकाग्रणी जो,
आकाशींचा गुरु चमकुनी ज्यास चित्तांत लाजो;
येवो लाटा हृदय–पटलीं दुःखशोकादिकांच्या,
यद्धैर्याचा हिमगिरि न तो स्थान सोडावयाचा !

१९

स्वार्थासाठीं ध्रुव तप करी, तो ध्रुवस्थान लाधे,
या बाळाचें जन–तप वघे, काळजी त्यास बाधे;
माझ्या स्थानीं करिल वसती काय हा पुण्यवान ?
पाहा हिंदी–विगति चिर तूं, पाहिना लोकमान्य !

२०

चिंता रात्रंदिन शयनिं वा भोजनीं एक ज्यातें–
साम्राज्यांतर्गत तरि मिळो राजता भारतातें !
कांहीं थोडी सुखकर तप सिद्धि येतां फळाला–
योगी गेले निघुन गगनीं देवलोकस्थळाला !

२१

तो सोन्याचा दिवस अजुनी जों न ये सौख्यकारी,
तों दुःखाचा नयनिं भरला दुष्ट अंधार भारी !
ज्ञानी किंवा असतिल कुणी मोठमोठे विरक्त;
राया ! तुम्हासम परि तुम्ही एकटे देशभक्त !

२२

बोलायाचा अवधि, उघडे भारताचे खजीनें !
शब्दें लक्षावधि जमविलीं देशभक्त-स्वसैन्यें !
सम्राटांच्या समचि सकलां भासले पूज्यमान !
राजत्वाचा मुकुट नव्हता मात्र दैदीप्यमान

२३

जेव्हां शत्रूवरि चमकलें लेखणी--खड्ग युद्धीं,
धीमंतांच्या चकितचकिता जाहल्या शुद्ध बुद्धी,
कर्णामध्यें अजुनि घुमते गर्जना केसरीची,
मूर्ती नाहीं दिसत परि ती भव्य पंचाननाची !

२४

स्वातंत्र्याचें तरुण-हृदयीं लाविलें बीज, त्याला-
आला नाहीं बहर अजुनी कोवळ्या पल्लवांला,
तों हा भासे विरह तुमचा त्याजलागीं उन्हाळा
रक्षा त्याची करिल पुढतीं कोण आतां दयाळा ?

२५

" हा पुण्यात्मा जरि उपजता अमुच्या जन्मदेशीं,
राजत्वाच्या पदिं बसवितों सत्य आम्ही तयाशीं !"

ग्रं. क्र. ३४४४

गाती ऐशी महतिहि परद्वीप-वासी मुखानें.
आम्ही त्यांचें प्रथित यश तें आयकावें सुखानें !

२६

होते कैसे तिलक निधडे निश्चयी राष्ट्र-कार्यीं ?
वाचा आधीं 'तिलक' उलटे; अर्थ नामांत राही !
घेतीना जे कलति कधिंही हिंदसेवा-स्वधर्मीं,
कर्मी कारागृह जरि, तरी सज्ज ते राष्ट्र-कर्मीं !

२७

होते का हो टिळक अबला-शिक्षणाचे चहाते ?
अस्पृश्यांची कळकळ शिवे काय त्यांच्या मनातें ?
सम्राटांच्या विषयिं विमल प्रेम का त्यांस राहे ?
या प्रश्नाचें प्रतिवच खरें 'होय' हें एक आहे !

२८

श्रीकृष्णाचा अवनिं घडला बालकृष्णावतार,
गीतातत्वें विशद कथिलीं ज्यांत वेदांत-सार,
ज्यांनीं त्यांना नयनि बघिलें, ऐकिली कंठवाणी,
तो तो प्राणी गहिंवरुनि हो ! आपणा 'धन्य' मानी !

२९

दुःखाश्रूंचे नयनयुगुलीं वाहती पूर ज्यांचे
त्यांच्या देहीं रुधिर उसळो वंद्य या पूर्वजांचें !
या काळाला फिरवुन अहा ! आर्यमाता-सुभक्त
यावे नाना तिलक पुढतीं देशसेवा-प्रसक्त

# लोकमान्यांचें यशोगायन

१

गेला ! गेला तिलक विजयी राष्ट्रकल्याणकारी !
शैलांच्याही कठिण-हृदयीं पाझरे दु:खवारी !
गंगा तेवीं विमल यमुना भेटतां एक जागीं,
आलिंगोनी बहुत रडल्या संगमाच्या प्रयागीं !

२

आतां डोळे रडुनि रडुनी आंधळे हाय होती,
गंगेहूनी अधिकहि जरी पाट त्यांचे वहाती,
लाभायाची नच जगतिं ती मूर्ति कोणास केव्हां !
गाण्यासाठीं गुणचि उरले गातसे न्यांस जिव्हा.

३

जे कुन्दासम लोककर्णयुगुलीं तेजोमती शोभले,
ज्यांनीं दिक्पट आपुल्या नवयशें कोरूनिया ठेविलें,
नामोच्चार करी यदीय, तनुतें आनंदरोमांचिता,
राष्ट्राच्याच ललाटिंचा तिलक जो शोभे तया धन्यता !

४

तुवां केलें तूझें प्रथित कुल विश्रांत सदया !
तयांमध्यें तारोज्ज्वल पुरुष आलेहि उदया.

तरी तेथें तूतें शशिसम असा मी समजतों !
' क्वचित् कोणी प्राणी निजकुल विभूषीत करितो '

५

ख्रिस्ताचा सन, जन्मकाळ तव जो, नेत्रांपुढें आदरीं,
घेईं त्यांतिल अंक मी, सहज जों बेरीज त्यांची करीं,
तों ती वीस भरे, मनांत मजला आश्चर्य वाटे महा !
वीसाव्या शतकांत वीस भरतां त्वन्मृत्यु आला पहा !

६

विद्येची तिलका ! सदा तुजवरी होती कृपा जी महा–
तेणें सन्मति वाढली; सुमतिनें सत्कर्म वाढे पहा !
कर्में वाढुनि पुण्य, सद्यश पुढें पुण्येंच त्या वाढलें !
वाढे त्याच यशें त्वदीय महिमा जेणें जगा मोहिलें !

७

शब्दीं मोहकता, मनीं विमलता. वृत्तींत शालीनता,
प्रेमीं पूर्ण उदारता, सरलता, लोकांत सन्मान्यता,
धर्मीं तत्परता, वचीं मधुरता, राष्ट्रीय तेजस्विता,
होते सद्गुण वंदनीय तुझिया एकांत हे सर्वथा !

८

मागायास उशीर, वाण नव्हती द्रव्यादिकांची तया,
त्याचे बोल तशी तयार जनता सोत्कंठ वागावया !

---

१ इ० स० १८९६.

नाहीं चंचल जाहला, न शिवली त्यातें अहंभावना·
ऐश्वर्यांतहि थोर सज्जन कधीं सच्छील सोडीचना !

९

धैर्यें तुझें हृदय सागरतुल्य होय,
तैसाच सागरहि तो हृदयोपमेय !
होतें तुझें मन मृदू कमलासमान
तैसेंच तें कमल मानसतुल्य जाण !

१०

चंद्र जैसा चकोरास शांतिप्रद
सूर्य चंडोल पक्ष्यास कीं सौख्यद,
जेविं मोरास बाष्पार्द्र अंभोधर,
भारताते तसा बाळ गंगाधर !

११

तुझ्यायोगें येई भरतविषयालागिं महती !
तुझीही त्यायोगें महति कळली सर्व जगतीं !
सदा तूं लोकांना भजसि, तुजही लोक भजती !
महत्कीर्तीला तूं समुचित, तुलाही उचित ती !

१२

न सिंहाला मंत्री, मृगपति परी तो म्हणवितो !
प्रधानावांचोनी शशि उडुपतीही मिरवितो !

तसा तूंही जाशी विभु म्हणवुनि देवभवनीं !
' स्वयंभू श्रेष्ठांना गुणचि करिती पूज्य भुवनीं !

१३

शत्रूंना गमलास तप्त रविसा, मित्रांस तूं चंद्र-सा
भक्तांना प्रभु राम-सा, रिपु-गणा तूं भाससी काल-सा
वाटे विस्मय कीं, असा विषम हा आभास कां होतसे ?
' ज्याची दृष्टि जशी असेल जगतीं आभास त्याला तसे!'

१४

कुणी म्हणति धर्म हा निरत राष्ट्रधर्मीं दिसे,
कुणी म्हणति पार्थ हा अचल सत्प्रतिज्ञा असे
प्रसाद-कविला गमे रुचिर वाढता इंदु हा !
कितीक तरि काजवे करिति लोकमान्य-स्पृहा !

१५

कुठें कुंद ! तैसा पयोवृन्द कोठें !
यशाची तुझी चारुता शुभ्र कोठें !
कुठें केतकी चंदनी क्षीण गंध !
तुझ्या कीर्तिचा त्याहुनीही सुगंध !

१६

कीर्तीचा तव दुंदुभी जन परद्वीपस्थही ऐकती
त्यांच्या भूमित मान्यता मिळविली जाऊन तेथें किती !
देवांचा गुरुही बृहस्पति रिझे पाहूनिया तूजसी
विद्वाना ! तुझियासमान जगतीं तू एकला शोभसी !

१७

वागणें गोड तैशी कृती गोडही,
आंत बाहेर जो सारखा या महीं,
यत्सदाचारसंपन्नता निर्मळा,
यक्ष कीं देव होता कळेना मला !

१८

ती सभाधीटता भाषणप्रौढता,
शब्दशालीनता बुद्धिची श्रेष्ठता,
थक्क झाली कितीदां सभा अंतरीं,
भाषणाची कुणा ना तुझी ये सरी !

१९

कृष्णाचा गमलास अंश सकलां तूं बालकृष्णा ! महीं
गीता विस्तृत भारतास कथिली त्वां कर्मयोगी नवी
शास्त्री पंडित वाग्विलासपटु हे त्वत्कीर्तिगंगांतरीं–
क्रीडाया सजती, तटावरिच ही मी स्नानसंध्या करी.

२०

सद्गुणाचीच तूं खाण लोकोत्तरा !
रत्न एकेक वेचू किती सुंदरा !
ठेविली दुर्बिणीची जरी सूक्ष्मता
पूर्ण येतील तारे कुणा मोजितां ?

२१

प्राणिसृष्टींत असे नर धन्य !
त्या नरांत नर–पंडित धन्य !
राष्ट्रभक्तहि तयाहुन धन्य !
धन्य त्यांत तिलक प्रभु धन्य ! !

# लोकमान्यांचा स्वर्गारव

( मंदाक्रान्ता )

१

शृंगारोनी कळस चढला रत्नसिंहासनाचा,
साश्चर्यानें अमर पुसती 'कोण हो यावयाचा ?'
तेथें स्वारी तंव थडकली बाळगंगाधराची !
'यावें यावें' सकल परिषत् बोलली निर्जरांची !

२

स्वर्बालांची कुशल रचना ज्यांत येते दिसोनी,
ज्यांचा गेला परिमल अहा ! सर्वभागीं भरोनी,
कंठीं माला अमित पडल्या देवपुष्पद्रुमांच्या,
कांठीं वृक्षावरि सुम नसे व्योमगंगानदीच्या !

३

भामा द्वारापुढतिं बघते पारिजात-प्रसूनें,
नेलीं कोणीं सकल इथुनी अंतरीं कांहिं नेणें !
श्रीकृष्णाच्या जवळ रुसली सत्यभामा सकाळीं,
ते हांसोनी वदति 'कुसुमें लोकमान्यार्थ नेलीं !'

४

स्वातंत्र्याच्या समरिं दिधलें पाठवोनी पतीला,
स्वत्वासाठीं दहन-कुहरीं आत्म-जोहार केला !

‘ आले स्वर्गी टिळक ! ’ कळतां त्या चितोडी स्त्रियांना
ओवाळाया पुढति सरल्या दिव्य पंचारतींना !

५.

वात्सल्यानें बघुनि नयनीं एकदां बाळकाला,
पाठीमागें कवळुनि जिनें बांधिलें अर्भकाला !
झांशीवाली लढत चढली स्वर्गसोपानमाला,
सर्वाआधीं तिलक तिलका पातली लावण्याला !

६

ऐक्यासाठीं निजमुखिं करी पृथ्विराजा विलापे,
एकाकीही अतुल लढला शूर राणा प्रताप !
ते दोन्हीही कवळिति तया खड्गधारी नितांत !
सत्प्रीतीचें उपशमन तें होय आलिंगनांत.

७

गेहद्वारीं बसुन अथवा सौधवातायनांत–
देवी तेथें रुचिर जमल्या गौरवातें पहात !
नृत्यारंभीं पद चमकती यक्षिणी–किन्नरींचे,
मागोनी ते ध्वनि रमविती बालकीर्तिस्तवाचे !



# महात्मा

—+❀+—

( वृत्त--भुजगप्रयात )

१

बुडो मेरु रत्नाकराच्या तळाशीं,
ध्रुव स्थान सोडो नभीं सद्विलासी,
असेही चमत्कार होतील नाना;
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

२

महीगोल सूर्यावरी आदळो हो !
रवी-गोल भूमिस्थळीं भ्रष्ट होवो !
अशा वेळिंही सत्व तें राखतांना—
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

३

पुढें माणकें आणुनी ठेविलींही,
तरी त्यांकडे जो वळोनी न पाही !
यमाच्या पुढें न्या तया धैर्यवाना,
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

४

विपत्तींत राहो, किती हाल होवो,
स्तुतिप्रीय राजा जनीं क्षुब्ध होवो,
जगीं लोक निंदोत वंदोत नाना,
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

५

" बटू हा नसे बा ! विराटस्वरूपी
त्रिपादांकिता भूमि देणें न सोपी "
बलीला असा शुक्र वारूं शकेना.
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

६

सुषुप्तींत पाहोनिया विप्र पूज्य–
हरिश्चंद्र–रायें दिलें दान राज्य.
प्रभातीं परी पाळिलें त्या वचांना !
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

७

मनोनिग्रही भीष्म, वाणी तयाची–
प्रतिज्ञा करी ब्रह्मचर्याश्रमाची
चुकेनाच आजन्म ती पाळितांना !
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

८

वदे कार्तिकस्वामि मातेस—" माते—
तुझ्यासारख्या कामिनी सर्व मातें ! "
जगीं ब्रह्मचारीच तो राहिला ना ?
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

९

" जिला मानिलें मी ' स्वसा ' एक वेळ
तिचा नाथ होऊं कसा ? तूंच बोल ? "
कचातें कवीची सुता मोहितांना—
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

१०

शुकाचार्य जो ब्रह्मचारी तयाला—
करी यत्न रंभा प्रमोहावयाला,
न मोही तिच्या कामचेष्टादिकांना,
महात्मा स्ववाणीवरोनी ढळेना !

# महात्मा मोहन

( चाल—चंद्रकांत. )

सत्याच्या खड्गाग्रावरतीं धैर्यें नाचुनिया—
मिरवावें पद तूंच 'महात्मा' बा मोहनराया ! १
मेसुर काळ्या मेघांमधुनी कडाडली विजली
सत्यद्वारांतून तुझी ना मूर्ति कधीं चळली ! २
अमृतविलोभें देवें दिधली सत्याला पाठ
प्रलोभनींही तुझा न सुटला सत्याचा कांठ ! ३
कुणि धर्मासम, कुणि भीष्मासम, कर्णासम कोणी
तूंच तुझ्यासम असशी, आणूं उपमा कोठोनी ? ४
तोफ मुलुखमैदान सुटो वा सुटो महांकाळी
तुझी अहिंसा अल्प न सुटली साधु कदाकाळीं ! ५
निर्मल निर्झर, निर्मल सरिता, निर्मल पुष्करिणी
उपकारांचे यानीं घ्यावे पाठ तवाचरणीं ! ६
भूगोलाच्या ध्रुवांस सांधुन गुण—धनु उभवीलें
असामान्य सामान्य ठरविलें अपणाहुनि सगळे ! ७
स्वर्गावरि जे गेले त्यांची नामावलि दीर्घ
असामान्य तूं, इथेंच केला पृथ्वीचा स्वर्ग ! ८

राष्ट्रवंद्य पुरुषांची आहे इतिहासीं साक्ष
जगद्वंद्य पहिला परमेश्वर, तूं दुसरा साच ! ९

युगांतरीं वेणूला मोहन वाजवुनी गेला
विश्वमोहना ! विश्वाला तव कंठ वेणु झाला ! १०

तुझिया अंकीं निजांतरींचा सोडुन अभिमान
विश्व निजो विश्वासानें हें ठेवुनिया मान ! ११

संत साधु तापसी यतीश्वर यांच्या नेत्रांचीं
पवित्र किरणें तुझ्या विलसतीं नेत्रीं तेजाचीं ! १२

राष्ट्राचें कल्याण सौख्य वा वांछा अभिवांछा
व्हाव्या निश्चित सफल तुझ्याची मार्गीं संस्कृतिच्या ! १३



# लोकमित्र

( वसंततिलका )

१

जे वाङ्मयांत रमती मतिमंत थोर,
देई नितांत सुख यद्रसना-विहार,
संपूज्य त्यांसहि गमे शुभ यच्चरित्र,
हा ये समुत्सुक हितप्रद ' लोकमित्र ! '

२

कल्याणिनी बुधमती तिजला भजावें,
कल्याणकारक विचार मुखीं वदावे,
कल्याण वित्त मिळुनी न घडे जरीही
कर्तव्यमूढ न दिसे तरि हा कधींही !

३

जें प्राप्त होय सहजीं तितुक्यांत तुष्ट !
तुष्टीस दे अमित साहुन देहकष्ट !
निष्कामकर्मरत साधुपथानुगामी-
मानार्ह हा गमतसे स्तुतिपुण्यधामी !

४

शोभे वनीं विकचवृक्ष–तती अखंड,
किंवा नभांत रविरंजित मेघ–खंड,
उद्यान शोभवि, तसें मधु वाङ्मयाचें !
मित्रोपकार न कदापि फिटावयाचे !

५

विद्याभिलाषि, रसिकाग्रणि कौतुकानें–
ह्याला समाश्रित करोत गुणज्ञतेनें.
' सन्मित्र–पूर्वसुकृती स्मरुनी मनांत
सामान्यही नसति विन्मुख त्यास होरे. '

# मित्र असा पाहिजे !

( शिखरिणी )

१

मराठ्यांचे जेथें 'हर हर' असे शब्द उठले,
महोत्साहें जेथें प्रबल-समरीं वीर लढले,
तिथें नेई चित्तें परवश-जनांचीं हरघडीं-
हवा मातें ऐसा जिवलग जिवाचा संवगडी !

२

स्वदेशाच्या कार्यीं निरलस गुणानें प्रकटतो,
स्वधर्माच्या कार्यीं अभिनव गुणानें विलसतो,
झटे लोकांसाठीं अविरत जयाची नित कुडी-
हवा मातें ऐसा जिवलग जिवाचा संवगडी !

३

प्रतिज्ञा पाळाया अविचल जणों भीष्म गमतो,
स्वकर्तव्याचारीं विगतभय कीं द्रोण गमतो,
चढे यच्चारित्र्यीं अभिनव यशाची वर गुढी-
हवा मातें ऐसा जिवलग जिवाचा संवगडी !

४

निगर्वी प्रेमाचें उपवनचि ज्याचें हृदय तें,
समाधानी अंतःकरण निरपेक्षेंत रमतें,
विपत्काळींही जो मुळिं न अपुलें दैन्य उघडी-
हवा मातें ऐसा जिवलग जिवाचा संवगडी !

५

सुमोद्यानापेक्षां विपिनहि बरें ज्यासह गमे,
बरी प्रासादाच्यापरिस कुटिका ज्यासह गमे,
चलच्चित्ताला जो वळवुन सुपंथास निगडी-
हवा मातें ऐसा जिवलग जिवाचा संवगडी !

# शीलावांचून

( वसंततिलका )

१

नीराविना कमल, रात्र शशीविना ती,
नेत्राविना वदन, दंतविहीन दंती,
किंवा फलाविण न शोभत वृक्ष लोकीं,
शीलाविना नरहि शोभत ना विलोकी ?

२

दीपाविना सदन, पुत्रविहीन तात,
पक्षाविना विहग, कंकणहीन हात,
किंवा मयूर न शिखेविण शोभतो तो,
शीलाविना नर न पूज्य जगांत होतो.

३

उद्यानहीन वन, नीरविहीन कूप,
अंभोजहीन सर, गंधविहीन धूप,
साधू न शोभत दयेविण कोपकारी,
शीलाविना नर न शोभत वाग्विहारी

४

आम्राविना न वनलक्ष्मिस रम्यता ये,
मेघाविना रुचिरता धरणी न लाहे,

ना कुंकुमाविण जशी तरुणी विराजे,
शीलाविना नर महींत न तेंवि साजे.

५

मानार्ह काव्य--कवि ना प्रतिभेशिवाय,
ना सत्कवीविण सभा स्तवनीय होय,
राजाश्रयाविण कवी, कविवीण राजा,
शीलाविना तशि नरास न मानपूजा.

६

हाराविना स्तन, कलाप सुमाविहीन,
तेजाविना शशि, महामति वेदहीन,
ना कांचनाविण जसा मणि रम्य भासे;
शीलाविना न पुरुषा रुचिरत्व तैसें.

७

पुच्छाविना चमरिणी, तरुवीण वेली,
शोभे न अंबुधर--वृष्टि जशी अकालीं,
पर्णाविहीन शिशिरांतिल वृक्षमाला,
शीलाविना नर न पूज्य जगांत झाला.

---

# निग्रही नव्हे दुराग्रही

( स्वागता–वृत्त )

१

ज्ञानवंत करितात विचार,
काढिती सकलसेवन–सार,
तेथ जे नित विरोधविकारी–
ते न निग्रहि, दुराग्रहि भारी.

२

ध्येय सुंदर दिसे दिसण्यांत,
देशघात निजघातहि ज्यांत !
आदळा शिर न जे वळणारे–
ते न निग्रहि, दुराग्रहि सारे.

३

लागुं देति शरिरास न वारा,
ना सुटे गृहधनादि पसारा
ह्या बघून हटपंडित खोटे–
ते न निग्रहि, दुराग्रहि मोठे.

४

बोधिती श्रुतिविदग्रणि नाना,
देति थोरहि उदाहरणाना;

सोडिती न अपुला पथ वाम-
त्या न निग्रहि, ' दुराग्रहि ' नाम.

५

जेथ साधु वरितात कृपेला
सेविती सुजन भूतदयेला
तेथ ना वळति कांहिं करून
ते न निग्रहि दुराग्रहि हीन

६

' निग्रही' जन वदोत ह्मणोनी
भांडती मतिविकार भरोनी
सत्य सोडुन विवाद निराळा
तो न निग्रहि, दुराग्रहि मेळा

७

देश—धर्म—कुलपालन—कर्मी
होतसे चल कधीं न मनोर्मी
होत निग्रहि नरेश्वर तेच
हे न निग्रहि, दुराग्रहि साच

# त्याच्यापेक्षां हें बरें !

—+*+—

( शालिनी–वृत्त )

१

अर्धज्ञानें अंतरीं ताठलेले
संपत्तीनें धुंद जे जाहलेले
त्यांच्या द्वारीं याचनेला फिरावें–
त्याच्यापेक्षां स्वस्थ गेहीं रहावें !

२

आपत्तीचे मेघ आले वळून
जागा नाहीं आश्रयाची म्हणून
ज्याला त्याला दैन्य कां दाखवावें ?
त्याच्यापेक्षां चंडिकेला स्मरावें !

३

क्रोधावेशें जाहला मूर्ख राजा
तेथें कैची लाभते मान–पूजा
जाळयाचें तेथचें काय भाग्य !
त्याच्यापेक्षां काननीं वास योग्य !

४

स्वार्थासाठीं घालितो हात कंठीं
कंठीं वाजे प्रीतिची शुष्क घंटी !
ऐशांची कां लालसा संगतीची !
त्यांच्यापेक्षा योग्य मैत्री पशूंची !

५

पोटामध्यें अग्नि पेटे क्षुधेचा
दुर्भाग्यानें काळ ये हीनतेचा
दारोदारीं दुष्ट भिक्षेस जाणें—
त्याच्यापेक्षां कंदमूलादि खाणें !

६

शृंगाद्रीची मालिका कोसळेल
देहाची ना दुर्दशा पाहवेल
ऐशा वेळीं शील सोडून द्यावें—
त्याच्यापेक्षां मृत्युला आळवावें !

७

नाशासाठीं खोदलें अग्निकुंड
ज्वाला जाती अंतराळीं प्रचंड
त्राणी भ्रष्ट नाच होवो तरीही
त्याच्यापेक्षां योग्य देहाहुतीही !

८

काव्यानें जे तुष्ट ना व्हावयाचे
वाहे पाणी पालथ्या घागरीचें
त्यांना काव्यें कासया रंजवावें ?
त्याच्यापेक्षां एकटें काव्य गावें !

९

जें इच्छावें प्राप्त तें होत नाहीं
प्रारब्धाचा लेख ना लुप्त होई
कां भोंदूचें स्तोम तें माजवावें ?
त्याच्यापेक्षां ईश्वराला स्तवावें !

# गाऊं नये त्यांपुढें!

( शा० वि० )

१

वाहे निर्झरिणी प्रशांत विजनीं पाषाण-संघांतुनी
तत्काव्यें मधु ऐकुनी उपलही जे जाहले निर्मळ
त्यांच्या संनिध बैसुनी सु-कविता गावी मनापासुनी
लोकीं जे भरले मलीनहृदयी गाऊं नये त्यांपुढें!

२

वृक्षांचे समुदाय वायुलहरीसंगें मुदें डोलती
पुष्पांचा मधु गंधरूप अपुला उच्छ्वास जे सोडिती
तच्छायेंत बसून उत्कटमनें काव्यें म्हणावीं नवीं
श्रेष्ठत्वास उगीच जे मिरविती गाऊं नये त्यांपुढें!

३

एकाचा कलशब्द ऐकुन दुजा गानास आरंभितो
ऐसा मत्सरहीन पक्षिनिकर स्नेहाळ तो वाटतो
त्यांच्या आवडिच्या लतातरुतळीं गावें मुदें त्यांसवें
यत्किंचित्‌ अपुलाच गर्व भरला गाऊं नये त्यांपुढें!

# श्रीमंत

" ईश्वरदत्त गुणांनीं जे श्रेष्ठ, त्यांच्यापुढें कुलपरंपरेनें आलेल्या वैभवाचा श्रेष्ठपणा, केवळ तुच्छ होय."

—विष्णुशास्त्री चिपळूणकर.

( शा० वि० )

१

मातृद्रोह करून हिंदजननी देऊन अन्या करीं—
जाळोनी प्रिय देशबंधु अपुले, त्यांच्या स्मशानावरी
उद्यानें नव–वाटिका उभविल्या, प्रासादही बांधिले !
ते श्रीमंत म्हणावयास जगतीं नाहीं कसे लाजले ?

२

जे वेदप्रणित स्वधर्म अपुला सोडोनिया भ्रष्टले !
स्वार्थाच्या नरकांतले कृमि अहा ! होऊन जे राहिले !
राष्ट्राला बुडवून दुष्ट चढले श्रीमंत मानावरी !
त्यांच्या भ्रष्ट पदावरी मिरविणें तोरा कशाला तरी ?

३

देशाच्या हितवर्धनीं व्यय सदा यत्संपदेचा घडे,
लाभालाभ–जयाजयादिविषयीं यचित्त ना सांपडे,
खड्गाग्रावरतीं रणीं बसवुनी लक्ष्मी गृहीं आणिली,
ते श्रीमंत खरोखरी कविजनीं तत्कीर्ति वाखाणिली !

४

द्रव्यानेंच अहो ! महत्पद जरी श्रीमंत हें लावणें
चांडाळाजवळी सुवर्ण बघतां ' श्रीमंत ' संबोधणें !
पापानें अथवा कसें मिळविलें त्यांचेंच ठावें तयां
बेटे हे वडिलावरी मिरविती श्रीमंत मानास या !

५

देवी सद्गुण ज्यास वंद्य सुजनीं मोठेपणा पाववी
यांची काय परंपरागत असे त्यांच्यापुढें थोरवी ?
ऐश्वर्यें जरि शोभतात नृपती हे छत्रधारी जनीं,
कोठें ते नृप, लोकमान्यहि कुठें, हा भेद घ्या पाहुनी ?

# तेव्हां–

( शा० वि० )

१

जेव्हां द्रव्यमदें नरेश बनतो विभ्रंशशील स्वतां,
जेव्हां आश्रित-रागलोभ न धरी दावी उदासीनता,
तेव्हां बाग्रसविज्ञ-सूज्ञ भजती अज्ञातवास-स्थिती
हंस श्रेष्ठ समीरदूषित अशा सन्मानसा सोडिती !

२

जेव्हां पामर कर्णदंश करिती मात्सर्यधर्मामुळें,
जेव्हां थोर विचार लोपुन अहंवृत्ती मनाला खिळे,
तेव्हां निस्पृह सत्वशील अपुल्या सत्वास संरक्षिती !
मेघाच्छादित चंचल स्थितिपरी राजाश्रयाची गती !

३

जेव्हां दुर्जन वित्तपास करिती हातांतलें बाहुलें,
जेव्हां स्वस्तुतिरूप मद्य पिउनी बुद्धी तयांची चळे,
तेव्हां पंडितमान्य पाय अपुला काढून घेती सुखें !
पाणी ठेउन घेइ त्या कुणि कधीं दोपावया ना शके !

४

जेव्हां वर्णन चालवी जमुनिया स्वार्थी जनांची सभा,
' आहां चंद्र तुम्ही, सुरेंद्रहि तुम्ही संपन्नदेहप्रभा ! '
तेव्हां योग्य मनुष्य मूर्ख ठरतो, जो मूकता सेवितो !
जेथें सर्वचि मूर्ख, सूज्ञ न तिथें संपूज्यता पावतो !

५

जेव्हां वंशपरंपरागत खुळा मोठेपणा माजतो,
जेव्हां तद्भव-गर्व तुच्छ कविला लेखावया पाहतो,
तेव्हां अंतरिं कःपदार्थ गणुनी तोही भजे चंडिका !
विद्यामानधनी तृणासम गणी गर्वाढ्य राजादिकां

६

जेव्हां एक हसे, दुजा गृहिं वसे, त्याला न कोणी पुसे,
जेव्हां चाड न राहते, स्व-नगरी कीं आपणाला हसे,
तेव्हां काय चुके, कुठें तरि चुके, हा शोध घ्यावा भला
दुर्मंत्री नृपकीर्तिहानि करितो, संभाजिचा दाखला !

# तूं व मी

( गझल )

जगाला सांग कांहींही तुला मी ना विरोधीन
हंसोनी शांत हृदयानें जगाचे दोष साहीन ! १
धनाला शील विकणारे परांना शील पुसणारे
तयांना घेइ सांगाती गळ्याची संपतां शक्ति ! २
जगाची भूल करितांना तुझेंही हृदय हांसेल
मनाच्या भ्रान्त पक्ष्याला विसावा कोंवि लाधेल ? ३
यशाच्या मागुनी धांव बघे मी त्यास निश्रांत
तवेच्छा विद्यमानांत ममेच्छा ती भविष्यांत ! ४
तुझी बा ! दूरदृष्टी जी निजार्थी भावना तींत
बनावें स्वार्थ-वैरागी शिरावें कीर्ति-भवनांत ! ५
पुराया मजसि गर्तेत उतर तूं आज गर्तेंत
विकर्मी अचिर कीर्ती घे निजूं दे सुचिर कीर्तींत ! ६
विशंकी अदय होवोनी वरोनी लोट मातीला
दिसे तूं आज पुरणारा पुढें राहील पुरलेला ! ७
स्वतांचें लाव मज काळें करोनी स्वच्छ घे हात
कलंकी मजसि राहूं दे रहा तूं निष्कलंकांत ! ८
भिडूं दे नजर नजरेला न ढाळी पापणी खालीं
बघूं दे अतुल पापाची धिटाई कोठुनी आली ? ९

# कृतघ्न कोण ?

बाणभट्टानें हर्षराजास दिलेले उत्तर.

( शा० वि० )

१

आहे आज, न जें ज्यां धन असें अत्यल्प राया ! दिलें,
तें नाहीं उरलें, अशाश्वत जगीं कां कांहिं बा ! राहिलें ?
सूक्तांनीं तव कीर्ति मात्र नृपते ! जी म्यां सुखें गायिली,
ती म्लान प्रळयांतही नरवरा ! होईल ना भूतलीं !

२

गेले जे विलसून पूर्वज तुझे पुष्पासमान क्षितीं,
त्यांचें नांव न राहिलें; असुनिही क्षोणीतळाचे पती !
ज्यानें दिक्पटलीं सुभाषित–वचीं त्वन्नाम बा ! कोरिलें,
त्याची का फिटणार सत्कृति ? जरी ऐश्वर्य हें वाहिलें !

३

आतां सांग ? अशा कवीस मजला ना मानिलें, सोडिलें,
तेव्हां कोण ' कृतघ्न ' हें शिशुसही ना सांगतांना कळे !
लोकांशीं वदतां ' कृतघ्न ' पद हें लावूं मला पाहशी,
होशी तूंच तुझा मलीन म्हणुनी हा खेद होतो मशीं !

४

राजा तूं असशील, तूं रसिक वा ! होतास ठावा कुणा ?
होते जाणत लोक कोण तुझिया सारज्ञतेच्या गुणा ?
वाणीतें मम ऐकुनीच कळली ज्या वाङ्मयाची कला
तो मातेंच ' कृतघ्न ' पोपट कसा बोलावया लागला !

५

" द्रव्यांनीं भरले अमूप सदनीं सत्कोश हे जौंवरी–
गेला एक तरी अनेक कवि ते येतील माझ्या घरीं "
माझ्या आधिं असे किती कवि गृहीं आले मला सांग ते ?
गर्वोक्ती सुकृतीविहीन मनुजा केव्हांहि ना शोभते.

# पहिली सलामी

( चाल—चंद्रकांत )

एक सोडिला बाण तयानें होशी घायाळ
अजून भरले भात्यामध्यें शर किति तेजाळ ? १

एक उडाला बार तोंच तव सुटलें अवसान
भरल्या तोफा नसति डागल्या बेहिमत्या ! जाण ! २

एक उडाला सुरंग, हाले तों बालेकिल्ला
जरिपटक्याचा अजुनि न चढला मर्दानी हल्ला ! ३

एक उसळली लाट अंबरीं अफाट दर्याची
विचार-नौका तों डगमगली अधैर्यवंताची ! ४

एक डफावरि थाप मारितां मुंबई वर चढली
छंदांची ललकारी अजुनी कानींहि न आली ! ५

जपलों एकच मंत्र तुझी तुज मूर्छा ना साहे
हृदयविदारी पंचाक्षरिचा पाठ पुढें आहे ६

कमरेचा खंजीर रोखला अवसानासरसा
'हाय' बोलसी, प्रताप साहसि भवानिचा कैसा ? ७

विंचवाचें लागलें जरा नख 'फूं फूं' करितोशी
कंठविदारी कृपाण अजुनि न चढला हातांशीं ८

डोक्यावरची कडकडली जों तेजस्विनि चपला
पायाळाची वृत्ति जाहली कंपनीय विकला ९

जों शेपेवरि पाय न पडला फणा उभारीशी
होइल जैं कालिया ! शिरीं नर्तन मग गति कैशी ? १०

जों गरुडाची एक भरारी गगनावर चढली
मत्सरसेना होरपळे मत्सर--वन्हिज्वाळीं ! ११

भीमथडीची दौड निघाली अटकेच्यावरतीं
तिज अडवाया उभी खराची ही खोगिरभरती ! १२

पापाचा पहिलाच घडा जों वाचुन संपविला
तों पाऱ्याची मिजास गेली ग्रंथ पुढें उरला ! १३

# शृगालान्योक्ति

( शिखरिणी )

१

शृगाला ! बैसोनी गजशिरिं महत्वास चढशी;
परी ठावें सर्वां कपटपटु तूं, धूर्त असशी !
तुला वाटे मातें सकल जनता पाहुन भिते;
समर्थाच्या श्वानासहि दचकणें भाग पडतें !

२

कुठें तो शौर्याचा निधि मृगपती, वारण कुठें ?
गजातें त्वद्वाणी ' हरि हरि ' अशी वर्णित सुटे !
दिसोनी कां यावी अनुचित अहंता तरि गजीं ?
स्तुतीनें भोळ्यांना फसविति महाधूर्त सहजीं !

३

तुझ्या किंवा त्याच्या नयनिं न दिसे जोंवरि हरी,
करी वाचाला तूं बडबड डुलो मत्तहि करी,
पळावें लागेल त्वरित परि पंचानन-रवें,
महाशूराआधीं बडबड जडांनाच करवे !

४

गजश्रेणीनाथा ! तव हित खरें मी बघतसें
परंतू द्वेष्ट्यांना महति अपुली ना सहतसे,
गजाला त्वद्वाणी स्वहितपर या गोष्टि शिकवी !
विमार्गी नेवोनी कपटपटु लोकांस फसवी !

५

गजातें दावाया हरिण निज कस्तूरि–गुण हा–
बळे, त्यातें कोल्हे–कुड करुनि कां वंचिसि अहा !
दिली नाहीं दैवें इतुकिहि करींद्रास सुमती !
गुणी लोकांचे ना सुगुण अधमांना सहवती !

६

जरी तूं तच्छीर्षा मिरविशि अहंभाविकपणें,
गजाच्या दानाची रुचि मधुकरांनाच मिळणें !
तुवां खावीं उष्टीं वनतरुलता–पल्लवसुमें !
कुभोज्यें जी वाढे मलिन मति ना ती उपशमे !

७

गजाचा या जेव्हां परिचय तुझा अल्प नव्हता–
तदा होती रात्रिंचरपिशुनवृत्ती सुविदिता !
मिळेना खायाला, भटकशि उदासीन विपिनीं !
विपत्ती जातांची स्थिति विसरती लोक भुवनीं !

८

महद्योगें लाधे सुपद तुजला जंबुक पशो !
महत्कार्यें कांहीं पदरिं तुझिया पुण्य निवसो.
न सोडी श्रीकंठीं वसुनि विष तो सर्प जहरी
जडोनी जो गेला खल अवगुण–त्याग न करी

# कस्तूरी--मृग

( वसंततिलका )

१

कस्तूरिका-मृग भयंकर पारध्यांनीं-
चोहींकडून धरिला अडवून रानीं !
होता किती दिवस ज्यावरि फार डोळा,
झाले तयाजवळ घातक सर्व गोळा !

२

मागे कुणाजवळ ना तृण खावयाला,
नाहे सरिज्जल वनांतचि प्यावयाला,
हिंसा करूं सजाति कां निरुपद्रव्याची ?
जे नीच त्यांस उपमा दुसरी कशाची ?

३

संरक्षक प्रभुविना दुसरा न त्याला,
अर्पी सगद्गद कुरंग निजाश्रुमाला !
गेला द्रवून हृदयांत गजार्तिहारी,
दैवें सुटे, द्रुत पळे मधुगंधधारी !

४

जैं जीव घेउन कुरंग जवें उडाला,
तैं व्याध-संघ मनिं विस्मित तो जहाला !

मागें कुरंग बघतो, पळतो पुढारी !
येवो न संकट कुणावरि जीवहारी.

५

तो भीति-संभ्रमित काननमार्गचारी
आश्वासितो पथिं तया कृषिकर्मकारी !
हाही तयाजवळ राहुन वेळ काढी,
घाता पराधिन-गर्तीत परंतु पाडी !

६

' जो सेव्य गंध-सुगुणें सकलांस वाटे,
प्राणी अयाचित असा मजलागिं भेटे ! '
योग्याभिमान जरि शेतकऱ्यास होई,
ऐका परंतु जन हो ? पुढची नवाई !

७

जे बैल दोन नित नांगर ओढणारे,
आयुष्य कष्ट करण्यांतचि घालणारे,
त्यांतील एक सुटला पशु तो पळाला !
केलें नियोजित मृगा हल ओढण्याला !

८

कस्तूरिका-गुण मुखें स्तवितो वरूनी !
कावाडकष्ट अधिकाधिक घे करूनी !
झाली अहा ! हळुहळू तनु शुष्क त्याची !
आहे उणीव म्हणती जगिं योजकांची !

९

नेपाळ–भूषण, हिमाचलसंनिवासी,
संतोषवी परिमळें अवघ्या दिशांशीं,
तो क्षीणगंध बघतां कुणि सद्रसज्ञ–
सद्बोध त्या कृषिवला करि भाव–सूज्ञ

१०

प्रासाद, रत्नमय चंदनगंधशाली–
ऋष्याश्रम, श्रुतिवचें जिथुनी निघालीं–
जो कौतुकास्पद तिथें गुणरूपयोगें !
तो बैल काय गमला तुज अर्थलोभें ?

११

पूर्वार्जित स्वयश अल्प असेल कांहीं,
हा लाभला यशवितानक गंधवाही !
रे स्वार्थलंपट ! असा उपयोग त्याचा ?
कीं रोग दुष्ट जडला मतिहीनतेचा ?

१२

भावी गुणज्ञ जन देतिल दोष जेणें–
होवो प्रमाद न असा निजलोभतेनें.
तो डोलला असुनिही कुणवी पहा ना ?
जो दोष मान्य करितो जन तो शहाणा.

# लोकोत्तर सद्गुणी

( शा० वि० )

१

जैसे आम्रतरूवरी पिक, तिथें स्वातंत्र्य ना हारवी.
आलिंगी अचलास मेघ, न तिथें स्वातंत्र्य तो घालवी.
आकाशीं विलसे अलिप्त परि हा राहे रवी सर्वदा.
जे लोकोत्तर सद्गुणी, परवशीं ते राहती ना कदा !

२

मेघांतून फिरे स्वतंत्र चपला जाई निघोनी कुठें !
इंद्राचें धनु अंबरीं विलसतें राहे न तेंही तिथें
प्राणाधार असाहि वायु भुवनीं स्वच्छंद वाहे सदा !
जे लोकोत्तर सद्गुणी, परवशीं ते राहती ना कदा !

* * *

३

राजा रायगडावरील कपटें दिल्लीश्वरें कोंडिला
तो जाळ्यांतुनि वीरसिंह सुटला आला पुन्हां स्वस्थला
आल्याही अनिवार ज्यांस न मिती ऐशा जरी आपदा
जे लोकोत्तर सद्गुणी, परवशीं ते राहती ना कदा !

# कवि-परीक्षा

( शा० वि० )

१

सर्पानें जहरी फणा उभविली नेला कवी त्यापुढें,
ना कांपेल चळेलही; तरि खरी त्याची परीक्षा घडे
कस्तुरी दहनांत टाकुन तिला का कांचनीं तोलणें ?
हें का होय खरें परीक्षण ? गुणा ना न्यूनता लावणें.

२

आला सिंह उफाळुनी, कवि करा झुंजावया संमुखी !
जाणावा 'कविराज' का भय-वचा काढी जरी ना मुखीं?
मोत्यें ठेवुनि ऐरणीवरि हिऱ्यासंगें तया तोलणें !
हें का होय खरें परीक्षण ? गुणा ना न्यूनता लावणें.

३

युद्धाच्या कथिशी मनोहर-कथा, घे खड्ग हातीं कवे !
जेथें नाचति खड्गवीर उठुनी तेथें उडी घे जवें !
व्यासाच्या करिं चाप देउन तया पार्थासवें तोलणें !
हें का होय खरें परीक्षण ? गुणा ना न्यूनता लावणें.

# कवीची इच्छा

( चाल—चद्रकात )

'बधिर' म्हणोनी 'मूक' गणोनी द्या मज सोडून
वेळ वांचला तो मी कवितांचिंतनिं लावीन ! १
'हीनातिथ्य' गणोनी ठेवा मद्गृह वर्जून
एकवृत्तिनें सुभाषितांची माला गुंफीन ! २
माझ्या उपवनिं मला बसूं द्या, येउं नका कोणी
अपूर्ण राहिल नवकुसुमांच्या गुच्छांची जुळणी ! ३
काव्यसुधेचे बिंदु टपकती, प्राशूं द्या, सोडा ?
तुम्हि अपुल्या सौख्यांत म्हणा कीं, 'वेडा हा ! वेडा !' ४
लहर लागली तुम्हांस वार्ताविनोद—सौख्याची
परंतु आली नाचत लहरी कविता—सिंधूची ! ५
नका मानुं मज, नका स्तवूं मज, ठेवा तुटकपणा
जोड दिली नित्यानंदाची, गणीन थोरपणा ! ६
उडत्या चंडोलाला सोडा, गगनीं जाऊं द्या !
कर्णविहारी मंगलगीतें त्याला गाऊं द्या ! ७
मेघमंडलीं पतंग भिडला त्याला तळपूं द्या
ओढुं नका स्नेहाची दोरी, थोडी सोडुन द्या ! ८
स्फूर्तीनें सोपान बांधिला चढल्या आकाशीं
होउं नका आडवे कल्पना-गति रोधायासी ! ९
स्वदेशिंच्या भावनेंत फिरतो गरगर राहाट
करूं नका अवरोध, तुटोनी जाइल हें सूत ! १०

* * *

नको जगाचा गजबजलेला स्वार्थी बाजार
गमे सुखप्रद चेतोल्हासी कानन-संचार ! ११
व्यवहाराचा बोध घेकिला, आला कंटाळा
गिरि, सरिता, तरु, लतिका करितिल शाश्वत बोध मला १२
वाद्यांच्या नादांत गुंगुनी डोलो ही जनता
गूढज्ञानरवानें रमविल अखंड मज सरिता ! १३
महार्हशय्या कशास व्हावी निद्रासुख घ्याया ?
हिरव्या कुरणावरी सुखानें निजेल ही काया ! १४
नानाविध यातना कशाला या पोटासाठीं ?
कंदमुळें महि-पोटीं, रु-फळें वृक्षांच्या देठीं १५
दाट पिकांतुन सळसळ येइल वायूचा नाद
तात्विक विश्वव्यापी त्यासह करीन संवाद ! १६
हरिणबालकांसवें फिरोनी हिरव्या शेतांत-
स्वातंत्र्याचें यथेच्छ सुख अनुभवीन चित्तांत ! १७
आम्राच्या शाखेवर बसुनी गाइल कोकीळ
निसर्गगानस्वरूपांत मम कविता प्रकटेल ! १८
उदयगिरीवर विराजतांना सृष्टीचा राजा
पक्ष्यांच्या कलरवांत मिळविन कल-रव मी माझा ! १९
चराचरीं नैसर्गिक सुंदर जी प्रीती--घटना
वाटे अनुभव तिचा घेउनी रमवावें स्वमना ! २०

# कविपश्चात्-

( चाल—चंद्रकांत )

मनःसृष्टिचा राजा गेला, गेला कविराज
राष्ट्राच्या सौख्याचें गेलें निधान कीं आज ! १
प्रकृतीच्या भावनोदधीच्या सफरी करणारा—
गेला त्रस्त जिवांना संकटिं शांती देणारा ! २
शून्यांतूनी अमरपुरीचे भव्य प्रासाद—
कोण अतां निर्मून ऐकविल स्वर्गांचे नाद ? ३
नीतीच्या वाटिका मनोहर, उपवन न्यायाचें
उभारण्याचें कवि- कौशल ना कोणा यायाचें ! ४
अज्ञाताच्या गहन सागरीं तत्वें ज्ञानाचीं—
तूंच काढिलीं, कवे ! गुंफिली हारावलि त्यांची ! ५
यक्षकामिनी किन्नरबाला यांच्या पायांचे
तूं वाजविले नूपुर अजुनी ध्वनि घुमती त्यांचे ! ६
तत्वज्ञानी, भक्त, मुमुक्षू यांच्या चित्ताला
शांत समाधी लावविणारी शुचि तव वचमाला ! ७
पाषाणाला देवपणा तव वाणीनें आला
भक्तिरसाचा समुद्र तुझिया कवितेनें भरला ! ८

* * *

सरस्वतीच्या उद्यानांतिल गानप्रिय बाळा !
देशबंधु लाविले स्वदेशीं स्वदेशभक्तीला ! ९
जागृत झाले निद्रित जे त्वत्कंठाच्या नादें
तुला पाहुनी निद्रित, रडती दुःखें निर्मोदें ! १०

ऐकवील खणखणाट आता खड्गांचा कोण ?
भाग्याच्या गिरिवरतीं चढविल देशाला कोण ? ११
समरीं लढतां नश्वर तनुचे तुकडे होतांना–
तू स्वर्गाचे उघडे केले दरवाजे त्यांना ! १२
स्फूर्तीचें तव काव्य ऐकुन स्वदेशभक्तांनीं–
भरुन काढिल्या परवशतेच्या खिंडी देहांनीं ! १३
राष्ट्रगीत तव, गीत–चरण तव उपजवि विश्वास !
जन्मभूमिचे त्यांच रोधिले अनंत निश्वास ! १४
देशस्थितिला इतिहासाची तूंच स्मृति द्यावी !
तुवाच राष्ट्रीं चैतन्याची ज्योत पाजळावी ! १५

* * *

ऊठ पुन्हां ऐकीव तुझीं तीं स्फूर्तिप्रद गाणीं
वीरवरांच स्फुरीव बाहू चढत्या अवसानीं ! १६
नभोमंडलीं मार भरारी स्वतंत्र कविराया !
भूगोलावरि ग्रहगोलांची दीप्ती वर्णाया ! १७
उदयाचलिं वा अस्ताचलिं तूं चढून वागीशा !
सांग जगाला रविचंद्रांच्या मनोज्ञ संदेशा ! १८
गिरिवर, गिरिनिर्झर, गिरिसरिता भेटुनिया यांशीं
करि विश्रुत बा ! श्रुतीविहारी तत्वें जगताशीं ! १९
जिवंत असतां ज्या लोकांला मोल न तव कळलें
कितीक रडले, अजून रडती, कितीक हळहळले ! २०
निराभिलाष नि'स्वार्थवृत्तिचा योगी संन्यासी
कीर्तीच्या मंदिरांत घेई चिर विश्रांतीसी ! २१

# मृतदेहास—

( मंदाक्रांता )

१

चैतन्याचा त्यजुन तनुला ईश्वरी अंश गेला,
देहा ! काष्ठसम जन तुझ्या लेखिती योग्यतेला !
शय्येखालीं तुज उतरितां लोपला लोकमान्य,
भूमीशय्येवरि मरण वा पुष्पशय्यीं समान !

२

आला जेव्हां समय सकलां सोडुनी जावयाचा—
आयुष्याची भरुन घटिका जाहली मूक वाचा !
झाले जीवा अपरिमित ते दुर्धर क्लेश अंतीं,
ज्याची त्याच्याविण न इतरां होय दुःखानुभूती !

३

काढायाला उचलुनि तुझ्या गोहिं बाहेर तूतें—
वैरी किंवा खलजन कुणी आंत येवोत येथें !
कैसेही ते धरतिल तरी क्षीणगात्रें धरोत,
मेल्या सिंहाजवळ हंसती जंबुकांचे कपोत !

४

ज्याच्यामध्यें जल मिसळिलें शीत न, स्नान त्याचें !
बाधायाचे तुज न चटके तीव्र उष्णोदकाचे !

दागीन्यांना उतरुन कुणी वस्त्र घालोत नव्य !
देहातीताजवळ मति ना सेव्य किंवा असेव्य !

५

शीतोष्णाची तुजसि न इथें अल्प बाधा घडेल !
काष्ठें वक्षावरतिं पडलीं भार ना तो गमेल !
चिंता नाहीं धडधड चिता पेटली भोंवतालीं !
पेटो मागें तनु-गृह जरी एकदां होय खालीं !

६

माता कांता फिरति भगिनी द्वारमार्गावरोनी,
प्रीतिबद्ध स्वजन फिरती ते स्मशानावरोनी !
हा सर्वांचा निवह इथल्या येथ राहावयाचा,
येई धर्माविण नच सवें मित्र कोणी जिवाचा !

७

आहे येथें वसति अपुली नित्य, ऐशा भ्रमानें-
मोठीं मोठीं नगर-भुवनें बांधिलीं त्वां श्रमानें !
तेथें आतां निजतिल दुजे, झोंप तूं या स्मशानीं !
गेली वेळा भरुन न चुकी येइ कांहीं करोनी !

८

जेथें पुष्पें फुलुनि पसरे गंध दाही दिशांना,
जेथें काढी रसिक विहगश्रेणि आलाप नाना,
आत्मोद्यान त्यजुन गगनोद्यान तूं सेवियेलें !
जे जे आले क्षणिक विभवा सोडुनी सर्व गेले !

९

बांधो कोणी मणिमय असे चंदनाचे महाल.
गेलीं अभ्रें गगनपटला भेदुनीया विशाल !
देवेंद्राचें भुवन समजो आपुलें वित्तवान,
सर्वांचें तें सदन ठरलें अंतकाळीं स्मशान !

१०

त्वां द्रव्याचा निधि जमविला पोट जाळून, त्याचे-
येथें झाले धनि भुजग हे आयत्या वारुळाचे !
सर्वांसाठीं तनु शिणविली शेवटीं बा ' परंतू-
केलेल्या त्वां सुकृत अथवा दुष्कृताचा धनी तूं !

११

म्यानांतूनी नृपति झुलला, पालखींतून गेला !
हत्ती-घोड्यावरतिं बसुनी देखणा स्वार झाला !
जाळायाला जवळ तुझिया आणिती प्रेतवाही !
प्रेतस्थानाजवळ नृप वा रंक हा भेद नाहीं !

१२

कार्यें कीर्तिप्रद निजकरीं श्रेष्ठ आरंभिलेलीं,
ज्यांची पूर्णस्थिति निजमनीं तूंच बा ! आखलेली;
त्यांची वैशी तुजविण तरी पूर्ति होईल नेणें !
झाली गेली महति कधिंही काळहानी न येणें !

१३

आयुद्वारीं वसुन सकलां काल हा हाक मारी
धाया प्रत्युत्तर न करितो एक कोणी तयारी
ऐशा लोका शिकविल तुझी संस्कृती बोध कांहीं
कोणी केली करिल सुकृती काल ना वाट पाही !

१४

श्रीकाशीचा प्रभु सुखभरें लोचनांनीं पहावा,
श्रीगंगेच्या विमल सलिलीं देह हा पूत व्हावा,
उत्कंठेच्छा मनिं उपजल्या, आंतल्या आंत मेल्या !
आल्या गेल्या कितिक दुबळ्या व्यक्ति मोहीं बुडाल्या !

१५

आशा, इच्छा, नवसुकृतिचे हेतु संकल्प कांहीं—
आयुष्याचें सरचि सुकतां पद्मराजी न राही !
आत्मा गेला उडुन वरतीं मोकळा राजहंस !
दुष्कृत्यांचा जनक न दिसे काळ कोठें नृशंस !

१६

आत्मा गेला गति मग पुढें काय होते तयाची ?
कोठें जातो वसति करितो कोणत्या सुस्थलाची ?
सांगायाला जरिहि असतीं येथ शास्त्रें अपार—
प्रत्यक्षाचा अनुभव नसे शब्दलेखांत फार !

१७

जो जो जाई मनुज वरतीं तो न येई फिरून
कैशी आहे कटु-रुचिरता तेथ, सांगे न कोण !
तत्वज्ञानी कथिति इतरां कल्पनातीत गोष्टी
अज्ञान्यांना पुरुन उरतो अंध-विश्वास पोटीं !

१८

कित्येकांना शव उपजवी मृत्यु-वैराग्य पोटीं
शब्दज्ञानी पढविति तयां कोरड्या ब्रम्हगोष्टी !
गेहीं येतां विसर पडतो पाहतां आप्तमित्र
ज्ञानी झाला शव बघुनिया एकटा बुद्ध मात्र !

१९

आता स्वार्थी रुसतिल न बा[illegible]ना देतील तूतें !
ताज्या दुःखें रडतिल पुढें विस्मृती होय त्यांतें !
या लोकांशीं तव न उरला प्रीति-संबंध कांहीं !
मेलेल्याला जगत मरतें, शून्य होती दिशाही !

२०

थोडेसेंही क्षत गवसता, क्षुद्र ज्याचे स्वभाव-
छिद्रान्वेषी अधम करिती कावळे ' काव काव '
दुःशीलातें त्यजिते न दुष्ट, पिंड खाती जमून !
ज्यांना नाहीं इतर उपमा तेच त्यांच्यासमान !

ग्रं. क्र. ३४४४

२१

बोलो मागें कुटिल कुणिही राग न द्वेष आतां !
निंदा किंवा स्तुति–वच वदो ना तुला हर्षचिंता !
बोलाया तूं वचाहि न अतां सत्य येशील मागें !
जाई ऐरावत निजपथीं भुंकती श्वान मागें !

२२

मात्सर्यानें जगतिं भलते माजले वैरभाव,
आतां त्यांचें श्रवणिं न तुला ऐकुं येईल नांव!
'आम्ही मोठे' वचन वदतां कां न ती लाज वाटे?
'मोठे माना,' म्हणुनि न कुणी मानिती लोक मोठे !

२३

दोषारोपें पुनरपि जरी जाहला राजकोप,
बाधायाला तिळभर नसे शक्त तो भूपताप !
कैसें चित्तीं बघुनि न तुला लोक होती शहाणे ?
आहे एक्या दिवशिं सकलां सोडुनी येथ जाणें !

२४

अंतर्ज्वाला भडकुनि मही–कंपही भव्य झाला,
किंवा शीर्षावरतिं अशनी–पात दु:सह्य झाला,
ग्रासायाला प्रलयगत वा पातला क्षुब्ध अब्धी,
होवो कांहीं तरि न उतरे अंतिंची ती समाधी !

२५

तूं ज्या स्थानीं स्वजन-निधनीं गायिलीं शोक-गीतें,
त्वद्दुःखानें भिजवितिल बा आप्त त्या या स्थलातें !
आप्तांचेही करितिल इथें आप्त कित्येक शोक;
कोणी आजी उदइक कुणी चालले एक एक !

२६

मोठे मोठे पुरुष असले दग्ध झाले इथें कीं,
वास्तव्याची ठळक न अशी राहिली खूण लोकीं
तारे लक्षावधि उगवती लोपतीही अनंत,
आहे पूर्वीपरि पसरिलें व्योम हें नीलकात !

# अभ्राच्छादित चंद्र

( शिखरिणी )

१

जगच्चित्तानंदी अमृतकरधारी उगवला
चकोरांनीं चेतोहर कुमुद-संघात फुलला
अहा ! काळा काळा घन पसरला त्याजवरतीं
गुणी लोकांचे ना गुण अधम लोकांस सहती !

२

तुवां चंद्रा ! प्रेमें धवलकिरणांनीं नटवुनी,
जयाच्या देहातें नयनविषयीभूत करुनी,
महौदार्यें केलें उपकृत; अहा ! तोच फिरला !
कृतघ्नांच्या चित्तांतिल मळ न कोणास कळला !

३

विलासाच्या सौधीं नवकिरण-माला पसरल्या
तिथें कांता कांतासह रतिसुखालागिं सजल्या !
गृहामाजी येती ललित-वनिता मंद-चरणीं !
नृशंसांच्या येती कृति भव-सुखाआड भुवनीं !

४

विलोकोनी तूंतें निजमनिं चकोरावलि झुरे
गवाक्षीं बैसोनी शशिवदनि-संघातहि फिरे

असे नांवाचा हा ' जलद, ' न दयानीरहि वसे !
नसे नामीं कांहीं, कृतिहुन परीक्षा घडतसे !

५

' कलास्वामी ' होशी, मिळविशि विधो ! पूर्ण पदवी
नभीं ज्योतिर्माला तुजपुढतिं ना तेज मिरवी
तुझ्या ऐश्वर्याचा दिवस, परि हा घात घडला !
प्रयत्नांचा दैवाविणाहि महिमा व्यर्थ ठरला !

६

अतां तारे व्योमीं चमक मिरवायास सजले !
तुवां ज्यांचे तेजोगुण सकल चंद्रा ! हरियले.
तसा खद्योतांचा निवह करितो नाच गगनीं !
गुणी जातां चाले अहमहमिका निर्गुणजनीं !

७

तुझ्या देहीं होतें दिसत रुचिरा ! लांछन जरी,
बघावेंसें वाटे अनिमिष तुझें मंडल तरी !
मिळालीं त्यायोगें तुज विविध नांवें कितितरी
गुणांमध्यें जाई विरुन, असला दोषहि जरी !

८

समुद्राच्या पोटीं जनन घडलें; लक्ष्मि भगिनी !
उमानाथें केलें स्थित तुज जटाजूट—भवनीं !
महन्मान्या ! तूंतें विषमजन—बाधा न चुकली !
विषारी सर्पाची मति कधिं विवेकास भजली ?

९

निशावृत्तीचे जे पशु गिरिगुहेमाजि दडले,
अतां ते अंधारीं हंसत वनि बाहेर पडले !
तुझ्या दुःखीं हर्षोत्सव अमित यांना गमतसे !
विपद्ग्रस्तांच्या वा ! असुखि अधमांचें सुख वसे !

१०

कुमुद्वर्णी ज्योत्स्नीं वनचर-भयातें विगणुनी,
सरिच्छ्रेष्ठा-गंगा-पुलिनिं बसल्या ज्या चमरिणी,
उठोनी त्या जाती, तटविटपकुंजांत बसती !
दुरात्म्यांच्या छायेंतुन बुध दहा हात सरती !

११

तुझ्या तेजें गंगा-तटयुग-शिला शुभ्र हंसती !
तसे चंद्रग्रावा धवलजल-वर्षाव करिती !
प्रभामंता ! ऐशा तुज उगिच हा मेघ छळतो !
फुटे पाषाणाला द्रव, न खललोकांस फुटतो !

१२

फुटोनी दुग्धाचा घट पसरला शुभ्र धरणीं--
तुझ्या कांतीमाजी तरि धवलिमा ये न दिसुनी !
अशा ज्योत्स्नास्थानीं घन-तिमिरता ही मिरवते
असाध्वी साध्वींच्या स्थलिं वसुनिही निंद्य ठरते !

१३

मृगांका ! ही हीनप्रभ वपु जरी सत्य दिसते,
जरी आतां पूर्वीपरि न नयनाला रमविते,
तरी कर्तव्याच्या तनु कठिण मार्गास सजते !
महात्म्यांच्या देहापरिस हृदयीं शक्ति वसते !

१४

मुखें ज्यांचीं झालीं मुदित तुजला बा ! बघुनिया,
गुणग्राही वाखूं शकति बुध मेघास नच या !
म्हणोनी कां त्यांचा तुजविषयिं तो आदर कमी ?
नसे हातीं कांहीं हळहळति ते मात्र हृदयीं !

१५

पडे तेजोहानी, वच न वदतां सर्व सहशी,
कुणापाशीं केव्हां परि न अपुलें दैन्य कथिशी !
निघोनी जाईल क्षणिक वळलेली महद्दशा,
बुधें होऊं यावी मति न अवकालांत विवशा.

# सागर

( मंदाक्रांता )

१

श्रीलक्ष्मीचा जनक म्हणुनी सागरा ! तूं प्रसिद्ध.
श्रीविष्णूचा श्वशुर तव ही गाजते कीर्ति शुद्ध.
प्रीती सारे विबुध करिती सूर्य–चंद्रासमान.
ज्याचे त्याचे गुणचि करिती त्याजला पूज्यमान.

२

देहानें जे कृश सरलही वृद्धितें पावलेले,
पर्णांचे ते शिरिं जणुं जटाभार विस्तारलेले,
जाणों देवप्रिय ऋषि उभे माड ते मोठमोठे !
पुण्यस्थानाविण न बहुधा राहती साधु कोठे.

३

ते आंबे, ते फणस, सफला पोफळी, नारळी त्या,
वेलींचे ते धवल फुलले कुंज जाऊन पाहा ?
खाड्यांमध्यें रुचिर भरलें सृष्टिसौंदर्य फार,
दुःखी जीवां अनुपम इथें शांति लाधे अपार !

४

ते देखावे तटतरुलता--निर्भरालिंगनाचे,
देती चित्तीं सुख खग–तती काननीं गायनाचें.

पत्रें पुष्पें वितरुनि लता साधिती पूजनातें,
पूज्याशीं ही सकल वसुधा ठेविते पूज्य नातें !

५

सारंगांचा कळप करितो गर्द झाडींत फेरी !
ऐकाया ये मधुनि मधुनी कोकिळाची लकेरी !
वायूची ये परिमलमयी सेव्य एकेक लाट !
मोठ्या गेहीं म्हणति असतो सर्व मोठाच थाट !

६

ज्यांची प्रीती तुजवरि सदा जीवनालंबनार्थी–
होड्यांतूनी जन विचरती मत्स्य–आहारवर्ती !
वृत्ती त्यांची परहितरता ! चालली त्वत्कृपेनें,
मोठ्या गेहीं गरिब दुबळे राहती आश्रयानें !

७

येथें भूमीवरि निवसती जीव जेसे अनेक,
त्वन्नीरींही जलचर तसे पोहताती कितीक !
कैशी निद्रा वरिति कवणा गूढ हें ज्ञात नाहीं,
जावें वंशीं कळुनि मग तें येतसे सर्व कांहीं !

८

चित्तीं ज्याची भय उपजवी गर्जना सत्वधीर,
सामर्थ्याचा तुजसम जगत्सिंह तूं एक वीर !
आकाशींचा तनयहि तुझा गर्जतो मेघ साचा,
सिंहापोटीं सुत न उपजे हीनतेजोगुणाचा !

९

वर्षर्तूंचे घन विचरती नीलवर्णी नभांत,
दाते तेही प्रथित असती नीरदा ! नीरदांत !
त्यांच्या ठायीं तवचि वसती सागरा ! धर्मकर्में,
पुत्रामध्यें जनक वसतो रूपसादृश्य-धर्में !

१०

वृष्टी होते तुजवरि यदा स्वातिच्या जीवनाची,
त्याचीं मोत्यें रुचिर घडतां मात्र येती तुलाची !
देहाला ना नटविशि जरी मौक्तिकें तीं अनंत.
श्रीमंतीतें नच मिरविती मूळचे भाग्यवत.

११

जी संपत्ती अमित भरली कैक वर्षानुवर्ष,
त्या कोशाचा तुज न शिवला गर्व किंवा प्रहर्ष !
पाहावा तो निखिल नयनीं वांछिती लोक सारे,
लोकांसाठीं उघडिलिं कुणीं संपदेचीं न दारें !

१२

चौदा रत्नें तव बहु तरीं निर्जरांनीच नेलीं,
होती सेव्या धवलहि सुधा प्राशिली त्याच वेळीं !
टाकोनी ती सुरजन सुरा मात्र गेले निघोनी !
त्याला त्याला रुचिर रुचतें, चाड्याचा न कोणी !

१३

श्रीशंभूनें विष पचविलें दाह देहीं जहाला !
तेव्हां प्रेमें अमृतकर तूं अर्पिला चंद्र त्याला !
भोगायाची कठिण विपदा कोणिही भोगतांना--
राहावेना उपकृतिविना मूळच्या सज्जनांना !

१४

लोकीं 'रत्नाकर' म्हणविशी, कां नसे दिव्य कांती?
दृष्टिक्षेपें तनुवरि दिसे सागरा ! नीलिमा ती.
राहे तूझ्या निकटं पसरी 'शाम' तो कांति नील !
देते मैत्री रुचिर फल हो सज्जनांची सुशील !

१५

कोठें तू, हा उडुपति निशानाथ कोठें मृगांक !
अन्योन्यांची अजत्रारि परी प्रीति बा ! निष्कलंक !
भेटीही त्यां दुरुनि घडती नाहिं एकत्रवास !
प्रीती होई चळित न जरी जाहला दूर-वास !

१६

जेव्हां वायु स्थिरगति दिसे सेविती रम्य शांती
संध्याकांचे किरण तुझिया जीवनीं लीन होती
वाटे स्वर्ग क्षितिवरि अहा ! पातला वैभवाचा
दैवी गोष्टी चकित करिती मानवी बुद्धि वाचा

१७

या टाकोनी नयनसुभगा ! आत्मरूपास जेव्हां–
तूं सह्याद्रीसम उफळिशी भव्य लाटांस जेव्हां–
तेव्हां दृष्टि क्षणहि न तुला शक्त होई पहाया,
घेई शांती बुधचि, न दुजा शक्त त्या शांतवाया !

१८

दुर्दैवानें अवचित तदा सांपडे जो खलाशी,
नेशी त्याला जलगिरिवरी टाकशीही तळाशीं !
तेव्हां चाले धडधड हृदीं, ठाउकी मात्र त्याशीं !
ज्याचें त्याला विदित असतें काळ येतां जिवाशीं !

१९

तूं मर्यादा त्यजशिल, तुला घातला बांध ऐसा,
जाशी सीमा त्यजुनि पुढतीं शक्तिनें पाहुं कैसा ?
मर्यादेच्या पुढतिं जलधे ! पायही टाकवेना !
विश्वेशाचा नियम कवणा एकही मोडवेना !

२०

या भूलोकीं तुजसम नसे अन्य सम्राट कोणी,
प्रक्षाळीशी सतत सलिलें हिंदभू–पाद दोन्ही !
सिंधो ! प्रेमें म्हणुनि तव हें गाइलें मी चरित्र,
मातृप्रेमें जननि–भजका वर्णिना कोण पुत्र ?

# एक पुष्पवृक्ष

( चाल—चंद्रकांत )

नाव न ठावें सुमवृक्षा ! तव जातिहि ना ठावी,
मी वाटेचा वाटसरू, क्षण मोहित परि होई !
सुंदर शाखा, सुंदर पर्णें, सुंदर सुममाला,
रसिकचि येती, ना बोलाविशि कोणा रसिकाला !
वसंत आला, बहार भरला, सुगंध दरवळला,
अष्ट दिशांच्या सभेंत कितिदा गुण—गौरव झाला !
हृदय हालले, फुलें गळालीं कोमल भंवतालीं,
क्षिति नाहीं तुज, आदर होवो सुकोत वा खालीं !
दैवाच्या भावना न शिवती, विषाद वा हर्ष,
गुणगंधाचा प्रसार करिती लोकोत्तर पुरुष !
म्यां न ऐकिल्या कुठें परिषदा प्रफुल्ल विटपांच्या,
आत्मश्लाघाही न ऐकिल्या निजगुण—कथनाच्या !
परोपकारी आयुष्याची घटिका प्रत्येक,
साधूंचा तुज, कीं त्यांना तव न कळे उपदेश !
आनंदाच्या गिरिवरी तव निशाण शांतीचें,
शत्रु मित्र समदर्शित्वानें वश तुज व्हायाचे !
सदा फुलावें, सदा डुलावें, निजगुण पसरावे,
उदरग्रासिची तुला न बाधा मिळेल तें घ्यावें !
दुर्धर दुःसह दास्य नको, हा बरवा वनवास,
पराधीन जीवाला तव हा बोधक इतिहास

# सारिका

१

आनंदा सरल स्वभाव, वचनीं मोही मनोहारिका,
आली ती उदरार्थ आजचि गृहद्वारापुढें सारिका
तीतें भान न, यौवनें पसरिली कांती स्वदेहावरी !
बाल्याचा सहज प्रमोद विलसे तल्लोचनाभ्यन्तरीं !

२

देहीं सुंदरता, वचीं मधुरता, जाणीव नाहीं परी !
कैसा तो अभिमान निर्मल मना स्पर्शील तीच्या तरी ?
ज्याशीं क्रीडशि निर्भयें गुणवती ! तो दैवशाली महा !
सेवावें गुण-माधुरीस दुरुनी अन्यें कुणीही अहा !

३

उत्कर्षाप्रति रूप सद्गुणकला पाव जिथ सर्वथा,
दैवी भास बुधास तेथ घडती हें बोलणें नान्यथा.
आम्ही मानव दिव्यतेस भुलतों पुण्याविना आगळे !
होतों प्रेम-पिसे विकारवशता बुद्धीस झाल्यामुळे !

४

हे पापी जन घातकी, न करणी ठाऊक यांची तुला !
नीडाबाहिर आज मात्र सचिरे ! तूं पाय हा काढिला !
कैशी मोहिनि घालतील तुजला ठेवावया पंजरीं,
नाहीं अल्पहि कल्पना सरळ या भोळ्या त्वदीयांतरीं !

५

आतां त्वद्गुण मंगले ! सुखविती सर्वांस जे सारखे,
एकाक्याच सुखास कारण तदा होतील गे ! सारिके !
जाशी जा उडुनी अहेतुक गडे ! चाहूल ऐकोनिया,
ठेवी सावधता अशीच अपुलें स्वातंत्र्य रक्षावया.

# बाल-बकुल

( शा० वि० )

१

उद्यानीं सहजीं मनोज्ञ बकुला ! येथें तुला लाविलें,
पाहोनी क्षणमात्र अन्य-हृदयीं न प्रेम हेलावलें,
चिंता खेद तुला नसो, दिन असे येतील सौख्यप्रद
येईल भ्रमरावली शरणही टाकोनिया दुर्मद !

२

होशील स्तबकावनम्र, हरितच्छायाहि डोलेल ती,
मेघांच्या सलिलें प्रफुल्ल कुसुमीं होईल शाखा-तती,
गंधें दाहि दिशा भरून तव जैं ऐश्वर्य हांसेल तें.
तेव्हां त्वत्तुलनेंत साधन तरी लाधेल कां कोणतें ?

३

येथें कीर्ति नसो, अजि स्तुति नसो, सन्मान कांहीं नसो
शेजारीं वट निंब पिप्पल जरी पूजार्ह झाले असो,
पुष्पांचे तव हार कंठिं वरुनी सारज्ञही धन्यता-
एकाला तुजलाच देतिल, तुझी ऐशी कुलश्रेष्ठता !

# पाहिजे

( चाल—चंद्रकांत )

ज्यांच्या रसवंतीवर नाचति विक्रम वीरांचे
श्रवणीं पडतां स्फुरती बाहू संगरधीरांचे ! १
ज्यांची कविता वाचित असतां भरते अश्रूंनीं
पराधीन या मातृभूमिच्या विरहालापांनीं ! २
ज्यांची गाते हृदयशारदा स्वराज्य—संगीत
स्वातंत्र्याच्या काळावरतीं दृष्टी फेकीत ! ३
ज्यांच्या काव्यीं देशभक्तिची प्रसन्न निर्झरिणी
जडासही स्फुरवीत वाहते रसिकां तोषवुनी ! ४
ज्यांच्या कंठकलेंतुन निघती ऐक्याचे सूर
मत्सर जाळुन रक्षा फेकिति द्वेषाची दूर ! ५
ज्यांचीं गीतें ऐकुन वाटे जिवंत हृदयाला
सह्याद्रीवर चढुन करावें ' हरहर ' घोषाला ! ६
स्वार्थाच्या मोहांतुन ज्यांचीं कवनें जागविती
विकळ भारताकडे पहाया दृष्टी वळवीती ! ७
ज्यांची परिसुनी पोवाड्यांची वाणी स्वच्छंद
आत्मयज्ञ राष्ट्रार्थ कराया होते मति धुंद ! ८
ज्यांचे परिसुन छंद, वाटते तरुणांच्या जीवां—
' पुरुषार्थाचा चिरकीर्तीचा मार्ग राष्ट्रसेवा ! ' ९
ते कवि, ते शाहीर पाहिजे राष्ट्राला आज
आम्ही त्यांना महार्ह पदवी देऊं ' कविराज ! ' १०

# कधीं

( दिंडी )

१

कसा प्रीतीच्या उपवनांत जाऊं ?
कशा प्रणयाच्या गोड कथा गाऊं ?
भारताचा गतकाल आठवोनी
स्फूर्ति होते मज शौर्यवीर्यगानीं

२

काय वेदांती बनुन वाद घालूं ?
काय आर्यांचें हेंच ध्येय पाळूं ?
देशभक्तांची चरितगानमाला
आज शांतविते माझिया मनाला

३

ज्यास आठवतां स्वाभिमान जागे
ज्यास आठवतां ऐक्य मनीं वागे
अशा काळाचें गीत मुखें गावें
भारताच्या दैवास आळवावें

४

स्वर्ग सुटला तरि सुटुन जाउं द्या हो
अम्हां त्याचा इतुका न जडे लाहो
कधीं होइल परि भारत स्वतंत्र
अम्ही उपभोगूं सौख्य तें स्वतंत्र

समाप्त

REFBK-0003444

# तिवारींचीं पुस्तकें

× * १ काव्यकुसुमांजलि [ शिल्लक नाहीं ] . . ०।१०

* २ काव्यरत्नमाला २॥

* ३ मनोहरलीला [ खंड काव्य ] .. ०।६

× * ४ प्रसन्नराधा " .. ०।६

× * ५ महाराणा प्रतापसिंह . . ०।८

* ६ मान्यांची यमुना . ०।६

७ अभंगमाला . . ०।४

८ कविता वनिता .. .. ०।८

९ मराठ्यांचीं संग्रामगीतें [आवृत्ति तिसरी सपत आली ] ०।१०

१० झांशीची संग्रामदेवता [ आवृत्ति दुसरी ] ०।८

× ११ राधामाधव [ खंडकाव्य ].. ०।१०

१२ चंडीशतक [अर्थालंकार व चित्रालंकार याचा संग्रह ] ०।१२

---

* हीं पुस्तकें मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

१।२।५।६।७ या नंबरचीं बुकें नागपूर विद्याखात्यानें मंजूर केली आहेत.

पहिल्या आठ पुस्तकास महाराष्ट्र-ग्रंथोत्तेजक-मंडळ—इंदूर या संस्थेनें बक्षिसें दिलीं आहेत.

× या बुकास दक्षिणाप्राईज कमेटीनें बक्षिसें दिलीं आहेत.

---


**सर्व पुस्तकें मिळण्याचे पत्ते:—**

१ दु० आ० तिवारी, जळगाव-पू० खानदेश.

२ परचुरे पुराणिक मंडळी, माधवबाग--मुंबई.

# काव्यकिरणमाला

(सं० व प्र०—मि० का० भोरटके)

## आगाऊ वर्गणी ५॥ रु०

वरील वर्गणींतून -।।।- प्रवेश फी वजा जाता बाकीच्या ४।।। रु० रकमेची फेड सरासरी दर तीन महिन्यानीं पुस्तकरूपानें केली जाईल. मालेंतील पुस्तकाची किंमत -।-पासून -।।- पर्यंत ठेविली जाईल, व मालेच्या ग्राहकास मालेचें प्रत्येक पुस्तक तीनचतुर्थांश किमतीस मिळेल.

मालेंतून आतापर्यंत पुढील पुस्तकें नियमितपणें प्रकाशित झालीं आहेत—

(१) महाराणा प्रतापसिंह -।।- (२) मान्यांची यमुना -।≈ (३) चंडीशतक -।।।- (४) कविता—वनिता -।।- (५) कुमुद्वती -।।- हीं सर्व पुस्तकें महाराष्ट्रशाहीर श्री० कवि तिवारी यांचीं आहेत.

—मि० का० भोरटके, जळगांव—पू० खानदेश.

38848